****

Sunder Kand

(Marathi)

****

श्रीजानकीवल्लभो विजयते

श्रीमद्गोस्वामी तुलसीदासविरचित

श्रीरामचरितमानसमधील

सुन्दरकाण्ड

(मराठी अर्थासह)

श्लोक

शान्तं शाश्वतमप्रमेयमनघं निर्वाणशान्तिप्रदं
ब्रह्माशम्भुफणीन्द्रसेव्यमनिशं वेदान्तवेद्यं विभुम्।
रामाख्यं जगदीश्वरं सुरगुरुं मायामनुष्यं हरिं
वन्देऽहं करुणाकरं रघुवरं भूपालचूडामणिम्॥ १॥

शांत, सनातन, अप्रमेय (प्रमाणातीत), निष्पाप, मोक्षरूप परम शांती देणाऱ्या, ब्रह्मदेव, महादेव व शेष यांच्याकडून निरंतर सेवा केल्या जाणाऱ्या, वेदांताने जाणता येणाऱ्या, सर्वव्यापक, सर्व देवांमध्ये सर्वश्रेष्ठ असणाऱ्या, मायेमुळे मनुष्य- रूपात दिसणाऱ्या, सर्व पापांचे हरण करणाऱ्या, करुणेची खाण असणाऱ्या, रघुकुळातील श्रेष्ठ व राजांमध्ये शिरोमणी असणाऱ्या आणि ज्याला राम असे म्हटले जाते, त्या जगदीश्वराला मी वंदन करतो. ॥१॥

नान्या स्पृहा रघुपते हृदयेऽस्मदीये
सत्यं वदामि च भवानखिलान्तरात्मा।
भक्तिं प्रयच्छ रघुपुङ्गव निर्भरां मे
कामादिदोषरहितं कुरु मानसं च॥ २॥

हे रघुनाथा, मी सत्य सांगतो आणि तू सर्वांचा अंतरात्मा आहेस (त्यामुळे सर्व जाणतोस.) माझ्या हृदयात इतर कोणतीही इच्छा नाही. हे रघुकुल श्रेष्ठा, आपली निर्भर (पूर्ण) भक्ती दे आणि माझे मन काम इत्यादी दोषांपासून रहित करून टाक. ॥ २॥

अतुलितबलधामं हेमशैलाभदेहं
दनुजवनकृशानुं ज्ञानिनामग्रगण्यम्।

सकलगुणनिधानं वानराणामधीशं
रघुपतिप्रियभक्तं वातजातं नमामि ॥ ३ ॥

अतुल बल-धाम, सुवर्ण-पर्वताप्रमाणे (सुमेरू) कांतियुक्त देहधारी, दैत्यरूप वनाचा नाश करण्यासाठी अग्निरूपी, ज्ञानी पुरुषांमध्ये अग्रगण्य , सर्व गुणांचे निधान, वानरांचा स्वामी व श्रीरघुनाथाचा आवडता भक्त असणाऱ्या पवनपुत्र हनुमानाला मी नमस्कार करतो. ॥ ३ ॥

जामवंत के बचन सुहाए। सुनि हनुमंत हृदय अति भाए ॥
तब लगि मोहि परिखेहु तुम्ह भाई। सहि दुख कंद मूल फल खाई ॥ १ ॥

जांबुवंताचे सुंदर वचन ऐकून हनुमंताला ते खूप आवडले. (तो म्हणाला,) 'मित्रा, तुम्ही सर्वजण दुःख सहन करीत आणि कंदमुळे व फळे खाऊन माझी तोपर्यंत वाट पाहा- ॥ १ ॥

जब लगि आवौं सीतहि देखी। होइहि काजु मोहि हरष बिसेषी ॥
यह कहि नाइ सबन्हि कहुँ माथा। चलेउ हरषि हियँ धरि रघुनाथा ॥ २ ॥

जोपर्यंत मी सीतेला पाहून येत नाही, हे काम निश्चितपणे होईल. कारण मला मनातून फार आनंद वाटत आहे.' असे म्हणून सर्वांना नमस्कार करीत व हृदयामध्ये प्रभू रामाला धारण करून हनुमान आनंदाने निघाला. ॥ २ ॥

सिंधु तीर एक भूधर सुंदर। कौतुक कूदि चढ़ेउ ता ऊपर ॥
बार बार रघुबीर सँभारी। तरकेउ पवनतनय बल भारी ॥ ३ ॥

समुद्रकाठी एक सुंदर पर्वत होता. हनुमान गंमतीने उडी मारून त्यावर चढला आणि वारंवार श्रीरामाचे स्मरण करीत अत्यंत बलवान असलेल्या हनुमंताने त्या पर्वतावरून मोठ्या वेगाने उड्डाण केले. ॥ ३ ॥

जेहिं गिरि चरन देइ हनुमंता। चलेउ सो गा पाताल तुरंता ॥
जिमि अमोघ रघुपति कर बाना। एही भाँति चलेउ हनुमाना ॥ ४ ॥

ज्या पर्वतावरून हनुमंताने उडी घेतली, तो पर्वत तत्काळ खचून पाताळ लोकी गेला. ज्या प्रमाणे श्रीरामाचा बाण अमोघ असतो त्या प्रमाणे हनुमान वेगाने निघाला. ॥ ४ ॥

जलनिधि रघुपति दूत बिचारी। तैं मैनाक होहि श्रमहारी ॥ ५ ॥

हनुमान हा रघुनाथाचा दूत आहे, असे समजून समुद्र मैनाक पर्वताला म्हणाला, 'हे मैनाका, तू याचा श्रम-परिहार कर.' ॥ ५ ॥

दो०– हनूमान तेहि परसा कर पुनि कीन्ह प्रनाम।
राम काजु कीन्हें बिनु मोहि कहाँ बिश्राम॥ १॥

हनुमानाने त्याला स्पर्श करून प्रणाम केला व सांगितले की, 'प्रभू रामाचे कार्य केल्यावाचून मला विश्रांती कुठली ?'

जात पवनसुत देवन्ह देखा। जानैं कहुँ बल बुद्धि बिसेषा॥
सुरसा नाम अहिन्ह कै माता। पठइन्हि आइ कही तेहिं बाता॥ १॥

पवनसुत हनुमान जात आहे, असे देवांना दिसले. त्यांनी त्याच्या बल-बुद्धीची परीक्षा घेण्यासाठी सर्पांची आई सुरसा हिला पाठविले. ती येऊन हनुमानाला म्हणाली, ॥१॥

आजु सुरन्ह मोहि दीन्ह अहारा। सुनत बचन कह पवनकुमारा॥
राम काजु करि फिरि मैं आवौं। सीता कइ सुधि प्रभुहि सुनावौं॥ २॥

'आज देवांनी मला (तुझ्या रूपाने) भोजन दिले आहे.' हे ऐकून हनुमंत म्हणाला, 'श्रीरामाचे कार्य पूर्ण करून मी परत येईन व सीतेची वार्ता प्रभूला सांगीन॥ २॥

तब तव बदन पैठिहउँ आई। सत्य कहउँ मोहि जान दे माई॥
कवनेहुँ जतन देइ नहिं जाना। ग्रससि न मोहि कहेउ हनुमाना॥ ३॥

मग मी तुझ्या तोंडात शिरेन (तेव्हा तू मला खा). हे माते, मी सत्य सांगत आहे. आता मला जाऊ दे.' जेव्हा काही केल्या सुरसेने जाऊ दिले नाही, तेव्हा तो म्हणाला, 'मग मला खाऊन का टाकत नाहीस ?'॥ ३॥

जोजन भरि तेहिं बदनु पसारा। कपि तनु कीन्ह दुगुन बिस्तारा॥
सोरह जोजन मुख तेहिं ठयऊ। तुरत पवनसुत बत्तिस भयऊ॥ ४॥

तिने एक योजन एवढे (चार कोस) तोंड पसरले. हनुमंताने मग त्याच्या दुप्पट मोठे शरीर धारण केले. तिने सोळा योजनांएवढे मोठे तोंड पसरले. तेव्हा हनुमान तत्काळ बत्तीस योजनांएवढा मोठा झाला. ॥ ४॥

जस जस सुरसा बदनु बढ़ावा। तासु दून कपि रूप देखावा॥
सत जोजन तेहिं आनन कीन्हा। अति लघु रूप पवनसुत लीन्हा॥ ५॥

सुरसा आपले तोंड जसजसे मोठे करीत होती, तसतसे हनुमंत त्याच्या दुप्पट आपले रूप दाखवीत होता. जेव्हा तिने आपले तोंड शंभर योजने मोठे केले, तेव्हा हनुमानाने तावडतोब अत्यंत छोटे रूप धारण केले. ॥ ५॥

बदन पइठि पुनि बाहेर आवा। मागा बिदा ताहि सिरु नावा॥
मोहि सुरन्ह जेहि लागि पठावा। बुधि बल मरमु तोर मैं पावा॥ ६॥

तो तिच्या तोंडात शिरून लगेच बाहेर आला आणि त्याने नमस्कार करून निरोप मागितला. तेव्हा ती म्हणाली, "देवांनी ज्यासाठी मला पाठविले होते, ते तुझ्या बुद्धि- सामर्थ्याचे रहस्य मला समजले. ॥ ६ ॥

दो०– राम काजु सबु करिहहु तुम्ह बल बुद्धि निधान।
आसिष देइ गई सो हरषि चलेउ हनुमान॥ २॥

तू बल-बुद्धीचे निधान असल्यामुळे रामप्रभूचे सर्व कार्य करशील." असा आशीर्वाद देऊन ती निघून गेली. तेव्हा हनुमान आनंदित होऊन पुढे निघाला ॥२॥

निसिचरि एक सिंधु महुँ रहई। करि माया नभु के खग गहई॥
जीव जंतु जे गगन उड़ाहीं। जल बिलोकि तिन्ह कै परिछाहीं॥ १॥

समुद्रामध्ये एक राक्षसी राहात होती. आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांना ती आपल्या मायावी शक्तीने पकडत असे. जे जीव- जंतू उडत असत, त्यांची सावली पाण्यात पाहात असे व- ॥ १ ॥

गहइ छाहँ सक सो न उड़ाई। एहि बिधि सदा गगनचर खाई॥
सोइ छल हनूमान कहँ कीन्हा। तासु कपटु कपि तुरतहिं चीन्हा॥ २॥

ती त्यांची सावली पकडत असे, त्यामुळे त्यांना उडता येत नसे. (आणि ते पाण्यात पडत) अशा प्रकारे ती आकाशात उडणाऱ्या प्राण्यांना खात असे. तसेच कपट तिने हनुमानाशी केले. तिचे कपट त्याने तत्काळ ओळखले. ॥ २ ॥

ताहि मारि मारुतसुत बीरा। बारिधि पार गयउ मतिधीरा॥
तहाँ जाइ देखी बन सोभा। गुंजत चंचरीक मधु लोभा॥ ३॥

धीर बुद्धीचा वीर हनुमान तिला ठार मारून समुद्रापलीकडे गेला. तेथे त्याला वनाची शोभा दिसली. तेथे मधाच्या लोभाने भ्रमर गुंजारव करीत होते. ॥ ३॥

नाना तरु फल फूल सुहाए। खग मृग बृंद देखि मन भाए॥
सैल बिसाल देखि एक आगें। ता पर धाइ चढ़েउ भय त्यागें॥ ४॥

त्या वनात नाना प्रकारचे वृक्ष फळाफुलांनी बहरले असल्यामुळे फार शोभून दिसत होते. तेथील पशु- पक्ष्यांचे थवे पाहून हनुमंताचे मन प्रसन्न होऊन गेले. त्याला समोर एक विशाल पर्वत दिसला, तो निर्भय होऊन धावत त्या पर्वतावर चढला. ॥ ४ ॥

उमा न कछु कपि कै अधिकाई। प्रभु प्रताप जो कालहि खाई॥
गिरि पर चढ़ि लंका तेहिं देखी। कहि न जाइ अति दुर्ग बिसेषी॥५॥

(महादेव म्हणतात) 'हे उमा, यात वानर हनुमानाचा काही मोठेपणा नाही. हा प्रभू रामाचा प्रताप आहे, तो काळालाही खाऊन टाकतो. पर्वतावर चढून त्याने लंका पाहिली.' (त्याने विचार केला की) फारच मोठा किल्ला आहे. काही सांगता येत नाही. ॥ ५ ॥

अति उतंग जलनिधि चहु पासा। कनक कोट कर परम प्रकासा॥ ६॥

तो अत्यंत उंच आहे, त्याच्या चोहीकडे समुद्र आहे. सोन्याच्या तटबंदीचा मोठा प्रकाश पसरला आहे. ॥६॥

छं०– कनक कोट बिचित्र मनि कृत सुंदरायतना घना।
चउहट्ट हट्ट सुबट्ट बीथीं चारु पुर बहु बिधि बना॥
गज बाजि खच्चर निकर पदचर रथ बरूथन्हि को गनै।
बहुरूप निसिचर जूथ अतिबल सेन बरनत नहिं बनै॥ १॥

विचित्र मणी जडवलेली सोन्याची तटबंदी आहे. त्याच्या आतल्या बाजूला सुंदर सुंदर घरे आहेत. तेथे चौक, बाजार, सुंदर मार्ग व गल्ली- बोळ आहेत. सुंदर नगर नाना प्रकारे सजविलेले आहे. हत्ती, घोडे व खेचरांच्या झुंडी, तसेच पायदळ आणि रथांचे समूह यांची गणना कोण करू शकेल? अनेक रूपांतील राक्षसांची सैन्यदले आहेत, त्यांच्या बलवान सेनेचे वर्णन करताच येत नाही. ॥ १ ॥

बन बाग उपबन बाटिका सर कूप बापीं सोहहीं।
नर नाग सुर गंधर्ब कन्या रूप मुनि मन मोहहीं॥
कहुँ माल देह बिसाल सैल समान अतिबल गर्जहीं।
नाना अखारेन्ह भिरहिं बहुबिधि एक एकन्ह तर्जहीं॥ २॥

वने, बागा, उद्याने, फुलबागा, विहिरी आणि आड यांनी ते नगर सुशोभित आहे. मनुष्यकन्या, नागकन्या, देवकन्या व गंधर्वकन्या आपल्या सौंदर्याने जणू मुनींच्या मनालाही भुरळ पाडीत आहेत. कुठे पर्वताप्रमाणे विशाल शरीराचे बलवान मल्ल गर्जना करीत आहेत. ते अनेक आखाड्यांमध्ये अनेक प्रकारे एकमेकांशी भिडत परस्परांना ललकारत आहेत. ॥ २ ॥

करि जतन भट कोटिन्ह बिकट तन नगर चहुँ दिसि रच्छहीं।
कहुँ महिष मानुष धेनु खर अज खल निसाचर भच्छहीं॥

एहि लागि तुलसीदास इन्ह की कथा कछु एक है कही ।
रघुबीर सर तीरथ सरीरन्हि त्यागि गति पैहहिं सही ।। ३ ।।

भयानक शरीराचे कोट्यवधी योद्धे मोठ्या प्रयत्नपूर्वक नगराची चारी दिशांनी (चोहीकडून) रखवाली करीत आहेत. कुठे दुष्ट राक्षस हे म्हशी, मनुष्य, गाई, गाढवे व बकऱ्या मारून खात आहेत. तुलसीदास यांची वार्ता थोडक्यात सांगत आहे, कारण प्रभूरामाच्या बाणरूपी तीर्थांमध्ये आपला देह विसर्जित करून हे सर्वजण निश्चितपणे परमगती प्राप्त करणार आहेत. ।। ३ ।।

दो०– पुर रखवारे देखि बहु कपि मन कीन्ह बिचार ।
अति लघु रूप धरौं निसि नगर करौं पइसार ।। ३ ।।

नगरातील बहुसंख्य रक्षक पाहून हनुमानाने मनात विचार केला की आपण अत्यंत लहान रूप धारण करून रात्रीच्या वेळी नगरात प्रवेश करावा. ।। ३ ।।

मसक समान रूप कपि धरी । लंकहि चलेउ सुमिरि नरहरी ।।
नाम लंकिनी एक निसिचरी । सो कह चलेसि मोहि निंदरी ।। १ ।।

मच्छरा सारखे अति लहान रूप धारण करून हनुमान नरलीला करणाऱ्या प्रभूरामाचे स्मरण करीत लंकेत निघाला. लंकेच्या द्वारावर लंकिनी नावाची एक राक्षसी राहात होती. ती हनुमानाला म्हणाली, 'माझा निरादर करून (मला न विचारता) कुठे चाललास? ।। २ ।।

जानेहि नहीं मरमु सठ मोरा । मोर अहार जहाँ लगि चोरा ।।
मुठिका एक महा कपि हनी । रुधिर बमत धरनीं ढनमनी ।। २ ।।

अरे मूर्खा, तुला माझे रहस्य ठाऊक नाही. जितके म्हणून चोर आहेत, ते सर्व माझे आहार आहेत.' (हे ऐकून) हनुमंताने तिला ठोसा मारला, त्यासरशी ती रक्त ओकत जमिनीवर कोसळली. ।। २ ।।

पुनि संभारि उठी सो लंका । जोरि पानि कर बिनय ससंका ।।
जब रावनहि ब्रह्म बर दीन्हा । चलत बिरंचि कहा मोहि चीन्हा ।। ३ ।।

मग ती लंकिनी स्वत:ला सावरून उठली व भयभीत होऊन हात जोडून म्हणाली की, 'जेव्हा ब्रह्मदेवाने रावणाला वर दिला, तेव्हा जाताना त्याने मला राक्षसांच्या विनाशाची खूण सांगितली होती. ।। ३ ।।

बिकल होसि तैं कपि के मारे । तब जानेसु निसिचर संघारे ।।
तात मोर अति पुन्य बहूता । देखेउँ नयन राम कर दूता ।। ४ ।।

वानराने मारल्यावर तू जेव्हा व्याकूळ होऊन जाशील, तेव्हा राक्षसांचा संहार झाला, असे तू समज. हे तात, प्रभू रामाच्या दूताला मी डोळ्यांनी पाहिले, हे माझे थोर पुण्य होय. ॥४॥

दो०– तात स्वर्ग अपबर्ग सुख धरिअ तुला एक अंग ।
तूल न ताहि सकल मिलि जो सुख लव सतसंग ॥ ४ ॥

हे तात, स्वर्ग व मोक्ष यांचे सर्व सुख जर तराजूच्या एका पारड्यात ठेवले, तरीही ते सर्व दुसऱ्या पारड्यात ठेवलेल्या सत्संगाच्या एका क्षणाच्या सुखाएवढेही होऊ शकत नाही. ॥ ४ ॥

प्रबिसि नगर कीजे सब काजा । हृदयँ राखि कोसलपुर राजा ॥
गरल सुधा रिपु करहिं मिताई । गोपद सिंधु अनल सितलाई ॥ १ ॥

अयोध्येचा राजा श्रीराम याला तू हृदयात धारण करून लंका नगरीत प्रवेश कर व सर्व कामे पूर्ण कर.(रामामुळे) विष अमृत बनते, शत्रू मैत्री करू लागतो, समुद्र गाईच्या खुराप्रमाणे छोटा बनून जातो व अग्नीमध्ये शीतलता येते. ॥ १ ॥

गरुड़ सुमेरु रेनु सम ताही । राम कृपा करि चितवा जाही ॥
अति लघु रूप धरेउ हनुमाना । पैठा नगर सुमिरि भगवाना ॥ २ ॥

(काकभुशुंडी म्हणाला,) 'हे गरुडा, ज्याला श्रीराम कृपा-दृष्टीने एकदा पाहतो, त्याला सुमेरूसारखा पर्वत एखाद्या रज-कणासारखा लहान बनून जातो.' मग हनुमंताने लहान रूप धारण केले व भगवंताचे स्मरण करून लंकानगरीत प्रवेश केला. ॥ २ ॥

मंदिर मंदिर प्रति करि सोधा । देखे जहँ तहँ अगनित जोधा ॥
गयउ दसानन मंदिर माहीं । अति बिचित्र कहि जात सो नाहीं ॥ ३ ॥

त्याने घरोघरी जाऊन शोध घेतला, तेथे सर्वत्र असंख्य योद्धे होते. नंतर तो रावणाच्या महालात गेला. त्या महालाचे वर्णन करणे शक्य नाही. तो महाल अत्यंत विचित्र होता. ॥ ३ ॥

सयन किएँ देखा कपि तेही । मंदिर महुँ न दीखि बैदेही ॥
भवन एक पुनि दीख सुहावा । हरि मंदिर तहँ भिन्न बनावा ॥ ४ ॥

(तेथे) रावण झोपला आहे, असे हनुमंताला दिसले, परंतु त्या महालात त्याला जानकी दिसली नाही. मग त्याला दुसरा एक सुंदर महाल दिसला. (त्यात) भगवंताचे एक वेगळे मंदिर बनविलेले दिसले. ॥ ४ ॥

दो०– रामायुध अंकित गृह सोभा बरनि न जाइ।
नव तुलसिका बृंद तहँ देखि हरष कपिराइ॥ ५॥

तो महाल श्रीरामाच्या धनुष्य-बाण या आयुधांच्या चिन्हांनी अंकित केलेला होता. त्याची शोभा वर्णन करता येणे शक्य नाही. तेथे तुळशीच्या नवनवीन झाडांचा ताटवा पाहून कपिराय हनुमानाला हर्ष झाला. ॥ ५॥

लंका निसिचर निकर निवासा। इहाँ कहाँ सज्जन कर बासा॥
मन महुँ तरक करैं कपि लागा। तेहीं समय बिभीषनु जागा॥ १॥

'लंका ही तर राक्षस-समाजाचे निवास-स्थान आहे. सज्जन (साधू) पुरुषाचा निवास इथे कसा?' हनुमान आपल्या मनात तर्क करू लागला, एवढ्यात बिभीषण जागा झाला. ॥ १॥

राम राम तेहिं सुमिरन कीन्हा। हृदयँ हरष कपि सज्जन चीन्हा॥
एहि सन हठि करिहउँ पहिचानी। साधु ते होइ न कारज हानी॥ २॥

त्याने (बिभीषणाने) रामनामाचे स्मरण केले, ते ऐकून हनुमंताने ओळखले की हा सज्जन आहे. त्याने विचार केला की याची ओळख मुद्दाम करून घेऊया. कारण साधु-पुरुषामुळे कार्य-हानी होत नाही. (उलट लाभच होतो). ॥ २॥

बिप्र रूप धरि बचन सुनाए। सुनत बिभीषन उठि तहँ आए॥
करि प्रनाम पूँछी कुसलाई। बिप्र कहहु निज कथा बुझाई॥ ३॥

(म्हणून हनुमानाने) ब्राह्मणाचे रूप धारण करून त्याला हाक मारली. ती ऐकताच बिभीषण उठून तेथे आला. नमस्कार करून त्याने खुशाली विचारली की, 'हे ब्राह्मणा, स्वत:बद्दल माहिती सांग. ॥ ३॥

की तुम्ह हरि दासन्ह महँ कोई। मोरें हृदय प्रीति अति होई॥
की तुम्ह रामु दीन अनुरागी। आयहु मोहि करन बड़भागी॥ ४॥

तू भगवंताच्या भक्तांपैकी कोणी आहेस काय? कारण माझ्या मनात तुझ्याबद्दल फार प्रेम वाटू लागले आहे. अथवा तू दीन-जनांवर प्रेम करणारा स्वत: रामच आहेस आणि (दर्शन देऊन) मला भाग्यवान बनविण्यासाठी आला आहेस का?' ॥४॥

दो०– तब हनुमंत कही सब राम कथा निज नाम।
सुनत जुगल तन पुलक मन मगन सुमिरि गुन ग्राम॥ ६॥

तेव्हा हनुमंताने श्रीरामाची सर्व वार्ता सांगून स्वत:चे नाव सांगितले. ते ऐकताच दोघांचे देह पुलकित झाले आणि रामाच्या गुणांचे स्मरण केल्याने दोघांची मने (प्रेम व आनंदामध्ये) मग्न झाली. ॥ ६॥

सुनहु पवनसुत रहनि हमारी। जिमि दसनन्हि महुँ जीभ बिचारी॥
तात कबहुँ मोहि जानि अनाथा। करिहहिं कृपा भानुकुल नाथा॥ १॥

बिभीषण म्हणाला, 'हे पवनसुत हनुमाना, माझी परिस्थिती ऐकून घे. ज्या प्रमाणे दातांच्या मध्ये बिचारी जीभ (घाबरून) राहात असते, त्या प्रमाणे हे तात, मला अनाथ समज. सूर्यवंशाचा नाथ श्रीराम माझ्यावर कृपा करील काय? ॥ १॥

तामस तनु कछु साधन नाहीं। प्रीति न पद सरोज मन माहीं॥
अब मोहि भा भरोस हनुमंता। बिनु हरिकृपा मिलहिं नहिं संता॥ २॥

तामस देह (राक्षस) असल्यामुळे माझ्याकडून साधन तर होत नाही आणि प्रभू रामाच्या चरण-कमलांविषयी मनात प्रेमही नाही. हे हनुमंता, आता मात्र मला विश्वास वाटू लागला आहे की श्रीरामाची कृपा माझ्यावर आहे, (कारण) हरि-कृपेविना संतांची भेट होत नाही. ॥ २॥

जौं रघुबीर अनुग्रह कीन्हा। तौ तुम्ह मोहि दरसु हठि दीन्हा॥
सुनहु बिभीषन प्रभु कै रीती। करहिं सदा सेवक पर प्रीती॥ ३॥

श्रीरामाने कृपा केली, म्हणून तू मला (आपणहून) मुद्दाम दर्शन दिलेस ना?' त्यावर हनुमंत म्हणाला, 'बिभीषणा, ऐक. आपल्या सेवकावर नेहमी प्रेम करणे, ही तर प्रभूची रीतच आहे. ॥३॥

कहहु कवन मैं परम कुलीना। कपि चंचल सबहीं बिधि हीना॥
प्रात लेइ जो नाम हमारा। तेहि दिन ताहि न मिलै अहारा॥ ४॥

सांग बघू, मी कुठे कुलीन आहे? (जातीने) सर्व प्रकारे मी नीच, चंचल असा वानर आहे. सकाळी आमचे नाव घेणाऱ्याला त्या दिवशी खायला मिळत नाही. ॥४॥

दो०– अस मैं अधम सखा सुनु मोहू पर रघुबीर।
कीन्ही कृपा सुमिरि गुन भरे बिलोचन नीर॥ ७॥

हे मित्रा, ऐक. मी असा अधम आहे, तरीही प्रभू रामाने माझ्यावर कृपा केली आहे.' भगवंताच्या गुणांचे स्मरण करताना हनुमानाच्या डोळ्यांत प्रेमाश्रू दाटले. ॥ ७॥

जानतहूँ अस स्वामि बिसारी। फिरहिं ते काहे न होहिं दुखारी॥
एहि बिधि कहत राम गुन ग्रामा। पावा अनिर्बाच्य बिश्रामा॥ १॥

हे जाणत असूनही अशा प्रभू रामाला विसरून जे लोक विषयांच्या मागे

भटकत असतात, ते दुःखी का बरे होणार नाहीत?' अशा प्रकारे रामाच्या गुणांचे कथन करताना त्याला अवर्णनीय शांती लाभली. ॥ १ ॥

पुनि सब कथा बिभीषन कही। जेहि बिधि जनकसुता तहँ रही॥
तब हनुमंत कहा सुनु भ्राता। देखी चहउँ जानकी माता॥ २॥

मग तेथे लंकेमध्ये सीता कशा प्रकारे राहात आहे, ते सर्व बिभीषणाने हनुमंताला सांगितले. तेव्हा हनुमंत म्हणाला, 'हे बंधू, ऐक. मी सीतामाईला पाहू इच्छितो.' ॥ २ ॥

जुगुति बिभीषन सकल सुनाई। चलेउ पवनसुत बिदा कराई॥
करि सोइ रूप गयउ पुनि तहवाँ। बन असोक सीता रह जहवाँ॥ ३॥

बिभीषणाने हनुमानाला सर्व उपाय सांगितले, तेव्हा बिभीषणाचा निरोप घेऊन तो निघाला. तो पूर्वीचे ते (लहान) रूप घेऊन जेथे अशोकवनात सीता राहात होती, तेथे गेला. ॥ ३ ॥

देखि मनहि महुँ कीन्ह प्रनामा। बैठेहिं बीति जात निसि जामा॥
कृस तनु सीस जटा एक बेनी। जपति हृदयँ रघुपति गुन श्रेनी॥ ४॥

सितेला पाहून हनुमंताने मनातल्या मनात प्रणाम केला. (त्याला दिसले की,) बसल्या बसल्याच तिचे रात्रीचे चारी प्रहर निघून जातात. तिचे शरीर अशक्त झालेले आहे. डोक्यावर जटांची एक वेणी आहे, आणि ती श्रीरामाच्या गुणांचे स्मरण करीत असते. ॥४॥

दो०- निज पद नयन दिएँ मन राम पद कमल लीन।
परम दुखी भा पवनसुत देखि जानकी दीन॥ ८॥

ती आपल्या पायांकडे पाहात (खाली पाहात) श्रीरामाच्या चरण-कमलांमध्ये मनाने मग्न झालेली आहे. सीतेला असे दीन-दुःखी पाहून पवनसुत हनुमानाला फार वाईट वाटले. ॥ ८ ॥

तरु पल्लव महुँ रहा लुकाई। करइ बिचार करौं का भाई॥
तेहि अवसर रावनु तहँ आवा। संग नारि बहु किएँ बनावा॥ १॥

वृक्षांच्या पानांमध्ये लपून हनुमान विचार करू लागला की, आता काय करावे बरे? त्याच वेळी बऱ्याच स्त्रियांसमवेत रावण नटून-थटून तेथे आला. ॥१॥

बहु बिधि खल सीतहि समुझावा। साम दान भय भेद देखावा॥
कह रावनु सुनु सुमुखि सयानी। मंदोदरी आदि सब रानी॥ २॥

त्या दुष्ट रावणाने सीतेला (अनुकूल करून घेण्यासाठी) अनेक प्रकारे समजावून सांगितले. साम-दाम-भय व भेद दाखवून पाहिले. तो सीतेला म्हणाला की, 'हे सुमुखी, हे बुद्धिमती स्त्रिये, ऐक. मंदोदरी इत्यादी सर्व राण्यांना – ॥ २ ॥

तव अनुचरीं करउँ पन मोरा। एक बार बिलोकु मम ओरा॥
तृन धरि ओट कहति बैदेही। सुमिरि अवधपति परम सनेही॥ ३॥

मी तुझ्या दासी करून टाकीन, असा माझा प्रण आहे. तू एकदा माझ्याकडे पाहा तर खरं.' तेव्हा आपल्या परमस्नेही अयोध्यापती रामाचे स्मरण करीत व (दोघांमध्ये) गवताच्या काडीचा आडोसा धरीत सीता म्हणाली, ॥ ३॥

सुनु दसमुख खद्योत प्रकासा। कबहुँ कि नलिनी करइ बिकासा॥
अस मन समुझु कहति जानकी। खल सुधि नहिं रघुबीर बान की॥ ४॥

'हे दशानन रावणा, ऐक. काजव्याच्या प्रकाशाने कधी कमलिनी उमलते काय?' ती पुढे म्हणाली, 'तू (स्वत:साठी) मनात असाच विचार कर. अरे दुष्टा, तुला रघुवीराच्या बाणांची कल्पना नाही. ॥४॥

सठ सूनें हरि आनेहि मोही। अधम निलज्ज लाज नहिं तोही॥ ५॥

अरे पाप्या, मला एकटी असताना तू हरण करून आणलेस. अरे अधमा, निलाजऱ्या, तुला लाज कशी वाटत नाही?' ॥५॥

दो०– आपुहि सुनि खद्योत सम रामहि भानु समान।
परुष बचन सुनि काढि असि बोला अति खिसिआन॥ ९॥

स्वत:ला काजव्याप्रमाणे व रामाला सूर्याप्रमाणे असे सीतेने म्हटलेले ऐकून व तिचे कठोर शब्द ऐकून रावण रागाने तलवार उपसून अत्यंत चिडून म्हणाला, ॥ ९॥

सीता तैं मम कृत अपमाना। कटिहउँ तव सिर कठिन कृपाना॥
नाहिं त सपदि मानु मम बानी। सुमुखि होति न त जीवन हानी॥ १॥

'सीते, तू माझा अपमान केला आहेस. या कठोर कृपाणाने तुझे शिर कापून टाकतो. अजुनीही माझे म्हणणे मान्य कर. नाहीतर हे सुमुखी, तुला प्राण गमवावे लागतील.' ॥१॥

स्याम सरोज दाम सम सुंदर। प्रभु भुज करि कर सम दसकंधर॥
सो भुज कंठ कि तव असि घोरा। सुनु सठ अस प्रवान पन मोरा॥ २॥

(सीता पुढे म्हणाली,) 'हे दशानना, श्रीरामाची भुजा नील कमळांच्या माळेप्रमाणे सुंदर व हत्तीच्या सोंडेप्रमाणे (पुष्ट व विशाल) आहे. ती भुजा एक तर माझ्या गळ्यात पडेल, नाही तर तुझी ही भयानक तलवार पडेल. हे दुष्टा, ऐक. माझा हाच प्रण आहे. ॥ २॥

चंद्रहास हरु मम परितापं। रघुपति बिरह अनल संजातं॥
सीतल निसित बहसि बर धारा। कह सीता हरु मम दुख भारा॥ ३॥

हे चंद्रहास तलवारी, रघुनाथाच्या विरह-अग्नीमुळे झालेल्या माझ्या संतापाचे हरण कर. हे तलवारी, शीतल, तीव्र आणि श्रेष्ठ अशी तुझी धार आहे. (तुझी धार थंड व तीव्र आहे.) तेव्हा तू माझ्या दु:खाचे ओझे हरण कर.' ॥ ३॥

सुनत बचन पुनि मारन धावा। मयतनयाँ कहि नीति बुझावा॥
कहेसि सकल निसिचरिन्ह बोलाई। सीतहि बहु बिधि त्रासहु जाई॥ ४॥

सीतेचे शब्द ऐकून रावण तिला मारून टाकण्यास धावून गेला, परंतु मय दानवाची कन्या मंदोदरीने नीती सांगून रावणाला समजावले. तेव्हा रावणाने राक्षसींना बोलावून सांगितले की, 'सीतेला तऱ्हेतऱ्हेने भीती दाखवा. ॥ ४॥

मास दिवस महुँ कहा न माना। तौ मैं मारबि काढ़ि कृपाना॥ ५॥

जर महिन्याभरात हिने माझे म्हणणे मान्य केले नाही तर मी हिला तलवार उपसून मारून टाकीन.' ॥५॥

दो०– भवन गयउ दसकंधर इहाँ पिसाचिनि बृंद।
सीतहि त्रास देखावहिं धरहिं रूप बहु मंद॥ १०॥

(असे सांगून) रावण घरी गेला. इकडे राक्षसींचे समूह अनेक वाईट रूपे धारण करून सीतेला भीती दाखवू लागले. ॥ १०॥

त्रिजटा नाम राच्छसी एका। राम चरन रति निपुन बिबेका॥
सबन्ही बोलि सुनाएसि सपना। सीतहि सेइ करहु हित अपना॥ १॥

त्या राक्षसींमध्ये श्रीरामाच्या चरणांवर प्रेम असणारी व विवेक-निपुण (ज्ञानी) अशी त्रिजटा नावाची एक राक्षसी होती. तिने सर्वांना बोलावून स्वत:ला पडलेले स्वप्न सांगितले. ती म्हणाली, 'सीतेची सेवा करून स्वत:चे कल्याण करून घ्या. ॥ १॥

सपनें बानर लंका जारी। जातुधान सेना सब मारी॥
खर आरूढ़ नगन दससीसा। मुंडित सिर खंडित भुज बीसा॥ २॥

मी स्वप्नात पाहिले की एका वानराने लंका जाळून टाकली आहे. राक्षसांची सर्व सेना मारली गेली आहे. रावणाचे डोके भादरले आहे, त्याचे वीसही हात तुटलेले आहेत. तो गाढवावर नागडा बसला आहे. ॥ २॥

एहि बिधि सो दच्छिन दिसि जाई। लंका मनहुँ बिभीषन पाई॥
नगर फिरी रघुबीर दोहाई। तब प्रभु सीता बोलि पठाई॥ ३॥

अशा प्रकारे तो दक्षिण दिशेला (यमलोकी) चालला आहे. लंका जणू

बिभीषणाला मिळाली. नगरामध्ये रघुवीराचा डांगोरा होत आहे आणि श्रीरामाने सीतेला बोलावणे पाठविले आहे. ॥ ३ ॥

यह सपना मैं कहउँ पुकारी। होइहि सत्य गएँ दिन चारी॥
तासु बचन सुनि ते सब डरीं। जनकसुता के चरनन्हि परीं॥ ४॥

मी निक्षून सांगते की हे स्वप्न चार दिवसांत खरे होईल.' तिचे बोलणे ऐकून सर्व राक्षसी फार घाबरल्या व त्या सीतेच्या पायावर लोळण घेऊ लागल्या. ॥ ४ ॥

दो०– जहँ तहँ गईं सकल तब सीता कर मन सोच।
मास दिवस बीतें मोहि मारिहि निसिचर पोच॥ ११॥

त्यानंतर त्या सर्वजणी इकडे-तिकडे निघून गेल्या. मग सीता मनात विचार करू लागली की एक महिना झाल्यावर नीच राक्षस मला मारून टाकणार. ॥ ११ ॥

त्रिजटा सन बोलीं कर जोरी। मातु बिपति संगिनि तैं मोरी॥
तजौं देह करु बेगि उपाई। दुसह बिरहु अब नहिं सहि जाई॥ १॥

ती त्रिजटेला हात जोडून म्हणाली की, 'हे माते, तू माझी संकटातील सोबतीण आहेस. तेव्हा मी शरीर-त्याग करू शकेन, असा एखादा उपाय लवकर कर. विरहाचे दुःख असह्य होत आहे. आता हे सहन होत नाही. ॥१॥

आनि काठ रचु चिता बनाई। मातु अनल पुनि देहि लगाई॥
सत्य करहि मम प्रीति सयानी। सुनै को श्रवन सूल सम बानी॥ २॥

हे माते, लाकडे आणून तू चिता तयार कर आणि तिला अग्नी दे. हे सुज्ञ, तू माझ्यावरील प्रेम खरे करून दाखव. रावणाची शूळासारखी वाणी कोण ऐकत राहाणार?' २ ॥

सुनत बचन पद गहि समुझाएसि। प्रभु प्रताप बल सुजसु सुनाएसि॥
निसि न अनल मिल सुनु सुकुमारी। अस कहि सो निज भवन सिधारी॥ ३॥

सीतेचे शब्द ऐकून तिचे पाय धरून त्रिजटाने प्रभू रामाचा प्रताप, बल व कीर्ती ऐकविली. ती म्हणाली, 'हे सुकुमारी, रात्रीच्या वेळी आग मिळू शकणार नाही.' असे सांगून ती आपल्या घरी निघून गेली. ॥ ३ ॥

कह सीता बिधि भा प्रतिकूला। मिलिहि न पावक मिटिहि न सूला॥
देखिअत प्रगट गगन अंगारा। अवनि न आवत एकउ तारा॥ ४॥

सीता म्हणू लागली की, 'ब्रह्मदेवच प्रतिकूल झाला आहे. आगही मिळत

नाही, आणि दुःखही संपत नाही. आकाशात तारे धगधगते निखारे प्रमाणे दिसत आहेत, परंतु एकही तारा पृथ्वीवर येत नाही. ॥ ४ ॥

पावकमय ससि स्रवत न आगी। मानहुँ मोहि जानि हतभागी॥
सुनहि बिनय मम बिटप असोका। सत्य नाम करु हरु मम सोका॥ ५॥

चंद्रमा अग्निमय आहे, परंतु तोही मला दुर्दैवी समजून आगीचा वर्षाव करीत नाही. हे अशोक वृक्षा, माझी विनंती ऐक. आपले नाव (अ-शोक)खरे करून माझा शोक हरण कर. ॥५॥

नूतन किसलय अनल समाना। देहि अगिनि जनि करहि निदाना॥
देखि परम बिरहाकुल सीता। सो छन कपिहि कलप सम बीता॥ ६॥

तुझी कोवळी पाने अग्नीसारखी लाल आहेत निःसंकोचपणे मला अग्नी दे. माझा अंत पाहू नकोस.' सीतेला विरहाने अत्यंत व्याकूळ झाल्याचे पाहून तो क्षण हनुमंताला कल्पासारखा वाटला. ॥ ६ ॥

सो०– कपि करि हृदयँ बिचार दीन्हि मुद्रिका डारि तब।
जनु असोक अंगार दीन्ह हरषि उठि कर गहेउ॥ १२॥

तेव्हा कपिरायाने मनात विचार करून (सीतेच्यासमोर रामाची) अंगठी टाकली. जणू अशोक वृक्षाने निखारा टाकला आहे, असे समजून तिने उठून हर्षाने ती हातात घेतली. ॥ १२ ॥

तब देखी मुद्रिका मनोहर। राम नाम अंकित अति सुंदर॥
चकित चितव मुदरी पहिचानी। हरष बिषाद हृदयँ अकुलानी॥ १॥

राम-नाम अंकित असलेली ती सुंदर अंगठी तिने पाहिली. ती रामाची अंगठी ओळखून ती चकित होऊन पाहू लागली. हर्ष व विषादामुळे तिचे हृदय व्याकूळ झाले.॥ १ ॥

जीति को सकइ अजय रघुराई। माया तें असि रचि नहिं जाई॥
सीता मन बिचार कर नाना। मधुर बचन बोलेउ हनुमाना॥ २॥

(ती विचार करू लागली, की अंगठी येथे कशी आली?) 'श्रीराम प्रभू हा अजेय आहे. त्याला कोण जिंकू शकेल? मायेने अशी दिव्य अंगठी बनविता येणार नाही.' ती नाना प्रकारचे विचार करू लागली, तेव्हा हनुमान मधुर वाणीने बोलू लागला.॥२॥

रामचंद्र गुन बरनैं लागा। सुनतहिं सीता कर दुख भागा॥
लागीं सुनैं श्रवन मन लाई। आदिहु तें सब कथा सुनाई॥ ३॥

तो श्रीरामाचे गुण वर्णन करू लागला. ते ऐकून सीतेचे दुःख पळून गेले. ती मन

व कान लावून ते ऐकू लागली. हनुमानाने सुरवातीपासूनची सर्व वार्ता सांगितली. ॥ ३ ॥

श्रवनामृत जेहिं कथा सुहाई। कही सो प्रगट होति किन भाई॥
तब हनुमंत निकट चलि गयऊ। फिरि बैठीं मन बिसमय भयऊ॥ ४॥

(सीता म्हणाली,) 'ज्याने कानांना ही अमृतमय वार्ता सांगितली आहे, तर मग हे बंधू, तू प्रकट का होत नाहीस ?' तेव्हा हनुमान तिच्याजवळ गेला. त्याला पाहून ती पाठमोरी होऊन बसली. (ते पाहून) त्याला आश्चर्य वाटले. ॥ ४ ॥

राम दूत मैं मातु जानकी। सत्य सपथ करुनानिधान की॥
यह मुद्रिका मातु मैं आनी। दीन्हि राम तुम्ह कहँ सहिदानी॥ ५॥

हनुमान म्हणाला, 'हे सीता माते, करुणानिधान श्रीरामाची सत्य शपथ घेऊन सांगतो की मी श्रीरामाचा दूत आहे. ही अंगठी मीच आणली आहे आणि ती रामाने ओळखीची खूण म्हणून तुला दिली आहे.' ॥ ५ ॥

नर बानरहि संग कहु कैसें। कही कथा भइ संगति जैसें॥ ६॥

(सीतेने विचारले की,) 'नर आणि वानर यांची संगत कशी झाली ते सांग.' तेव्हा हनुमंताने ही संगत कशी झाली, ते सांगितले. ॥ ६ ॥

दो०– कपि के बचन सप्रेम सुनि उपजा मन बिस्वास।
जाना मन क्रम बचन यह कृपासिंधु कर दास॥ १३॥

कपिराजाचे प्रेमळ शब्द ऐकून सीतेच्या मनात विश्वास निर्माण झाला. तिने जाणले की हा काया-वाचा-मनाने कृपासिंधू श्रीरामाचा सेवक आहे. ॥ १३ ॥

हरिजन जानि प्रीति अति गाढ़ी। सजल नयन पुलकावलि बाढ़ी॥
बूड़त बिरह जलधि हनुमाना। भयहु तात मो कहुँ जलजाना॥ १॥

भगवंताचा सेवक आहे, हे समजल्यावर सीतेला हनुमंताबद्दल फार प्रेम वाटू लागले. तिचे डोळे पाणावले व शरीर रोमांचित झाले. ती म्हणाली, 'हे तात हनुमंता, मी विरह-सागरात बुडत असताना तू (मला वाचविण्यासाठी) जहाज झालास. ॥ १ ॥

अब कहु कुसल जाउँ बलिहारी। अनुज सहित सुख भवन खरारी॥
कोमलचित कृपाल रघुराई। कपि केहि हेतु धरी निठुराई॥ २॥

माझा जीव तुझ्यावरून ओवाळून टाकते. आता खर राक्षसाचा शत्रू व सुखधाम असलेल्या श्रीरामाची छोट्या भावासहित खुशाली सांग. रघुनाथ तर कोमल हृदयाचा व कृपाळू आहे, मग हे हनुमंता, त्याने निष्ठुरता का धरली आहे? ॥ २ ॥

सहज बानि सेवक सुख दायक। कबहुँक सुरति करत रघुनायक॥
कबहुँ नयन मम सीतल ताता। होइहहिं निरखि स्याम मृदु गाता॥ ३॥

सेवकाला सुख देणे हा त्याचा सहज स्वभाव आहे. तो माझी कधी आठवण काढतो का? त्याचे कोमल व श्यामल अंग पाहून माझे नेत्र कधी तृप्त होतील का?' ॥३॥

बचनु न आव नयन भरे बारी। अहह नाथ हौं निपट बिसारी॥
देखि परम बिरहाकुल सीता। बोला कपि मृदु बचन बिनीता॥ ४॥

तिच्या तोंडातून शब्द फुटेना. डोळ्यांत पाणी भरून आले. ती दुःखाने उद्गारली, 'हे नाथा, तू मला पूर्णपणे विसरून गेलास?' सीतेला विरहामुळे अत्यंत व्याकूळ झालेली पाहून हनुमान मृदु व नम्र वाणीने म्हणाला – ॥४॥

मातु कुसल प्रभु अनुज समेता। तव दुख दुखी सुकृपा निकेता॥
जनि जननी मानहु जियँ ऊना। तुम्ह ते प्रेमु राम कें दूना॥ ५॥

'माते, सुंदर कृपेचे धाम असलेला प्रभू श्रीराम हा बंधू लक्ष्मणासह सुखरूप आहे, परंतु तुझ्या दुःखामुळे दुःखी आहे. हे माते, मनात उणे (ग्लानी) आणू नकोस. श्रीरामाच्या मनात तुझ्यापेक्षा तुझ्याबद्दल दुप्पट प्रेम आहे. ॥५॥

दो०– रघुपति कर संदेसु अब सुनु जननी धरि धीर।
अस कहि कपि गदगद भयउ भरे बिलोचन नीर॥ १४॥

हे माते, आता धीर धरून श्रीरामाचा निरोप ऐक,' असे सांगितल्यावर हनुमंत प्रेमाने सद्गदित झाला. त्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. ॥१४॥

कहेउ राम बियोग तव सीता। मो कहुँ सकल भए बिपरीता॥
नव तरु किसलय मनहुँ कृसानू। कालनिसा सम निसि ससि भानू॥ १॥

तो म्हणाला, 'श्रीरामाने सांगितले आहे की, सीते, तुझ्या विरहामुळे सर्व पदार्थ मला प्रतिकूल झालेले आहेत. वृक्षांची नवीन कोमल पाने अग्नीसारखी, रात्र ही कालरात्रीसारखी, चंद्रमा हा सूर्यासारखा आणि –

कुबलय बिपिन कुंत बन सरिसा। बारिद तपत तेल जनु बरिसा॥
जे हित रहे करत तेइ पीरा। उरग स्वास सम त्रिबिध समीरा॥ २॥

कमळांची वने भाल्यांच्या वनासारखी बनली आहेत. आकाशातील मेघ जणू उकळत्या तेलाचा वर्षाव करीत आहेत. जे हितकारी होते, तेच आता दुःख देत आहेत. त्रिविध (शीतल, मंद व सुगंधित) वायू सापाच्या श्वासाप्रमाणे (गरम व विषारी) झालेला आहे. ॥२॥

कहेहू तें कछु दुख घटि होई। काहि कहौं यह जान न कोई॥
तत्व प्रेम कर मम अरु तोरा। जानत प्रिया एकु मनु मोरा॥ ३॥

मनातले दुःख सांगितल्यावर काहीसे कमी होते, पण सांगू कुणाला? माझे हे दुःख कुणालाही उमजत नाही. माझ्या आणि तुझ्या प्रेमाचे रहस्य हे प्रिये, एक माझेच मन जाणते. ॥ ३॥

सो मनु सदा रहत तोहि पाहीं। जानु प्रीति रसु एतनेहि माहीं॥
प्रभु संदेसु सुनत बैदेही। मगन प्रेम तन सुधि नहिं तेही॥ ४॥

ते माझे मन नेहमी तुझ्याजवळच असते. माझ्या प्रेमाचे गुपित यातच काय ते समजून घे.' प्रभू रामाचा हा निरोप ऐकताच सीता प्रेम-मग्न होऊन गेली. तिला देहाचे भान राहिले नाही. ॥ ४॥

कह कपि हृदयँ धीर धरु माता। सुमिरु राम सेवक सुखदाता॥
उर आनहु रघुपति प्रभुताई। सुनि मम बचन तजहु कदराई॥ ५॥

तेव्हा हनुमंत म्हणाला, 'माते, मनात धीर धर. सेवकांना सुख देणाऱ्या श्रीरामाचे स्मरण कर. मनात श्रीरामाच्या प्रभुतेबद्दल विश्वास बाळग आणि माझे म्हणणे ऐकून मनातून भित्रेपणा काढून टाक. ॥ ५॥

दो०– निसिचर निकर पतंग सम रघुपति बान कृसानु।
जननी हृदयँ धीर धरु जरे निसाचर जानु॥ १५॥

राक्षसांचे समुदाय पतंगाप्रमाणे असून श्रीरामाचे बाण अग्नीप्रमाणे आहेत. हे माते, मनात धीर धर. आता ते राक्षस जळून मरणार असे समज. ॥ १५॥

जौं रघुबीर होति सुधि पाई। करते नहिं बिलंबु रघुराई॥
राम बान रबि उएँ जानकी। तम बरूथ कहँ जातुधान की॥ १॥

(तू कुठे आहेस हे) श्रीरामाला जर कळले असते, तर त्याने उशीर लावला नसता. हे जानकी माते, श्रीरामाच्या बाणाचा सूर्य उगवल्यावर राक्षसांच्या सेनेचा अंधकार कुठे उरेल? ॥ १॥

अबहिं मातु मैं जाउँ लवाई। प्रभु आयसु नहिं राम दोहाई॥
कछुक दिवस जननी धरु धीरा। कपिन्ह सहित अइहहिं रघुबीरा॥ २॥

हे माते, मी तुला आता घेऊन गेलो असतो, परंतु श्रीरामाची शपथ घेऊन सांगतो की मला प्रभूची तशी आज्ञा नाही. हे माते, काही दिवस धीर धरून राहा. श्रीराम हा वानरांसहित येथे येईल. ॥ २॥

निसिचर मारि तोहि लै जैहहिं। तिहुँ पुर नारदादि जसु गैहहिं॥
हैं सुत कपि सब तुम्हहि समाना। जातुधान अति भट बलवाना॥ ३॥

तो राक्षसांना मारून तुला घेऊन जाईल. मग नारदादी (ऋषि-मुनी) त्रैलोक्यात त्याचे यशोगान करतील.' तेव्हा सीता हनुमंताला म्हणाली की, 'हे पुत्रा, सर्व वानर तुझ्यासारखेच (लहान) असणार. राक्षस तर मोठे बलवान योद्धे आहेत. ॥३॥

मोरें हृदय परम संदेहा। सुनि कपि प्रगट कीन्हि निज देहा॥
कनक भूधराकार सरीरा। समर भयंकर अतिबल बीरा॥ ४॥

त्यामुळे माझ्या मनाला संशय वाटतो.' (तुझ्यासारखे लहान वानर त्या राक्षसांना कसे जिंकतील?) हे ऐकून हनुमंताने आपले खरे रूप प्रकट केले. ते सुवर्ण पर्वताच्या (सुमेरू) आकाराचे विशाल होते. ते मोठे बलवान व वीर रूप होते. युद्धामध्ये शत्रूच्या मनात धडकी भरून टाकणारे होते. ॥ ४॥

सीता मन भरोस तब भयऊ। पुनि लघु रूप पवनसुत लयऊ॥ ५॥

(ते पाहून) सीतेच्या मनात भरवसा आला. मग पवनसुत हनुमानाने पुन्हा लहान रूप धारण केले. ॥ ५॥

दो०– सुनु माता साखामृग नहिं बल बुद्धि बिसाल।
प्रभु प्रताप तें गरुड़हि खाइ परम लघु ब्याल॥ १६॥

(तो सीतेला म्हणाला,) 'हे माते, ऐक. वानरांमध्ये मोठी बल-बुद्धी नसते. परंतु प्रभू रामाच्या प्रतापामुळे छोटा सापसुद्धा गरुडाला खाऊ शकतो.' (अत्यंत लहानसुद्धा बलवानाला मारून टाकू शकतो.) ॥ १६॥

मन संतोष सुनत कपि बानी। भगति प्रताप तेज बल सानी॥
आसिष दीन्हि रामप्रिय जाना। होहु तात बल सील निधाना॥ १॥

भक्ती, प्रताप, तेज व सामर्थ्य यांनी युक्त असलेली ती हनुमानाची वाणी ऐकून सीतेला संतोष वाटला. तो रामाचा लाडका आहे, असे समजून तिने त्याला आशीर्वाद दिला की, 'हे बाळ, तू बल व शीलाचे निधान होशील.

अजर अमर गुननिधि सुत होहू। करहुँ बहुत रघुनायक छोहू॥
करहुँ कृपा प्रभु अस सुनि काना। निर्भर प्रेम मगन हनुमाना॥ २॥

हे पुत्रा, तू अजरामर होशील. गुणांचे भांडार होशील. श्रीराम तुझ्यावर मोठी

कृपा करो.' 'श्रीराम प्रभू कृपा करो' असे वचन कानांनी ऐकताच हनुमान पूर्णपणे प्रेमात बुडून गेला. ॥२॥

बार बार नाएसि पद सीसा। बोला बचन जोरि कर कीसा॥
अब कृतकृत्य भयउँ मैं माता। आसिष तव अमोघ बिख्याता॥ ३॥

त्याने सीतेच्या चरणी वारंवार मस्तक नमविले व हात जोडून म्हटले, 'माते, आता मी कृतकृत्य झालो. तुझा आशीर्वाद अमोघ असतो, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. ॥ ३॥

सुनहु मातु मोहि अतिसय भूखा। लागि देखि सुंदर फल रूखा॥
सुनु सुत करहिं बिपिन रखवारी। परम सुभट रजनीचर भारी॥ ४॥

ऐक माते, (येथील) सुंदर फळांचे वृक्ष पाहून मला फार भूक लागली आहे.' (त्यावर सीता म्हणाली,) 'मुला, ऐक. मोठमोठे राक्षस वीर या वनाची रखवाली करतात.' ॥४॥

तिन्ह कर भय माता मोहि नाहीं। जौं तुम्ह सुख मानहु मन माहीं॥ ५॥

(तेव्हा हनुमंत म्हणाला,) 'माते, जर तुला सुखाचे वाटत असेल, (तू आनंदाने आज्ञा दिलीस,) तर मला त्यांचे भय वाटत नाही.' ॥ ५॥

दो०– देखि बुद्धि बल निपुन कपि कहेउ जानकीं जाहु।
रघुपति चरन हृदयँ धरि तात मधुर फल खाहु॥ १७॥

हनुमंत हा बुद्धी व बळ यांमध्ये निपुण आहे, असे पाहून सीता त्याला म्हणाली की, 'हे तात, श्रीरामाचे चरण हृदयी धारण करून गोड फळे खा जा.' ॥ १७॥

चलेउ नाइ सिरु पैठेउ बागा। फल खाएसि तरु तोरैं लागा॥
रहे तहाँ बहु भट रखवारे। कछु मारेसि कछु जाइ पुकारे॥ १॥

हनुमंत सीतेपुढे नतमस्तक होऊन बागेत शिरला. तो फळे खाऊन झाडे मोडून टाकू लागला. तेथे रखवाली करणारे पुष्कळ योद्धे होते. त्यांतील काहींना हनुमंताने मारून टाकले. काहींनी ओरडत जाऊन रावणाला सांगितले. ॥ १॥

नाथ एक आवा कपि भारी। तेहिं असोक बाटिका उजारी॥
खाएसि फल अरु बिटप उपारे। रच्छक मर्दि मर्दि महि डारे॥ २॥

'हे नाथा, एक मोठा वानर आला आहे. त्याने अशोक वाटिका उजाड करून टाकली. त्याने फळे खाऊन झाडे उपडून टाकलीत आणि रखवालदारांना चेचून-चेचून खाली पाडले आहे.' ॥ २॥

सुनि रावन पठए भट नाना। तिन्हहि देखि गर्जेउ हनुमाना॥
सब रजनीचर कपि संघारे। गए पुकारत कछु अधमारे॥ ३॥

हे ऐकून रावणाने पुष्कळ योद्धे पाठवून दिले. त्यांना पाहून हनुमंताने गर्जना केली. त्याने सर्व राक्षसांचा संहार केला. जे अर्धमेले झाले होते, ते ओरडत गेले. ॥ ३॥

पुनि पठयउ तेहिं अच्छकुमारा। चला संग लै सुभट अपारा॥
आवत देखि बिटप गहि तर्जा। ताहि निपाति महाधुनि गर्जा॥ ४॥

रावणाने मग आपला पुत्र अक्षयकुमाराला पाठविले. तो असंख्य योद्धे बरोबर घेऊन आला. तो येत आहे असे पाहून हनुमंताने एक वृक्ष उचलून ललकारले व त्याला मारून मोठ्याने गर्जना केली. ॥ ४॥

दो०– कछु मारेसि कछु मर्देसि कछु मिलएसि धरि धूरि।
कछु पुनि जाइ पुकारे प्रभु मर्कट बल भूरि॥ १८॥

त्याने सैन्यातील काहींना मारून टाकले, काहींना चिरडून टाकले व काहींना धूळ चारली.' त्यांतील काही ओरडत जाऊन रावणाला म्हणाले की, 'हे प्रभू, वानर मोठा बलवान आहे.' ॥ १८॥

सुनि सुत बध लंकेस रिसाना। पठएसि मेघनाद बलवाना॥
मारसि जनि सुत बाँधेसु ताही। देखिअ कपिहि कहाँ कर आही॥ १॥

(अक्षयकुमार) पुत्राचा वध झाला, हे ऐकून रावण फार रागावला. त्याने आपल्या (ज्येष्ठ पुत्र) बलवान मेघनादाला पाठविले. (तो त्याला म्हणाला) 'पुत्रा, त्याला ठार न मारता बांधून आण. तो वानर कुठला आहे, ते तरी पाहूया.' ॥ १॥

चला इंद्रजित अतुलित जोधा। बंधु निधन सुनि उपजा क्रोधा॥
कपि देखा दारुन भट आवा। कटकटाइ गर्जा अरु धावा॥ २॥

इंद्राला जिंकलेला मेघनाद हा अतुलनीय योद्धा निघाला. आपल्या भावाला मारल्याचे ऐकून त्याला फार क्रोध आला होता. हनुमानाने पाहिले की, मोठा भयंकर योद्धा आलेला आहे. त्याने दात खाऊन गर्जना केली व धावून गेला. ॥२॥

अति बिसाल तरु एक उपारा। बिरथ कीन्ह लंकेस कुमारा॥
रहे महाभट ताके संगा। गहि गहि कपि मर्दइ निज अंगा॥ ३॥

त्याने एक मोठा वृक्ष उपटून घेतला व लंकेश्वर रावणाचा मुलगा मेघनाद याला विरथ केले. (त्याचा रथ मोडून टाकला.) त्याच्याबरोबर जे मोठमोठे वीर होते त्यांना आपल्या हातापायांनी चिरडले. ॥ ३॥

तिन्हहि निपाति ताहि सन बाजा। भिरे जुगल मानहुँ गजराजा ॥
मुठिका मारि चढ़ा तरु जाई। ताहि एक छन मुरुछा आई ॥ ४॥

त्या सर्वांना मारून तो मेघनादाशी जाऊन भिडला. (असे वाटत होते की) जणू दोन गजराज (श्रेष्ठ हत्ती) परस्परांशी भिडले आहेत. हनुमानाने मेघनादाला एक ठोसा मारला व तो वृक्षावर चढून बसला. मेघनादाला एक क्षणभर मूर्च्छा आली. ॥ ४॥

उठि बहोरि कीन्हिसि बहु माया। जीति न जाइ प्रभंजन जाया ॥ ५॥

मग त्याने पुन्हा उठून मोठी माया केली, परंतु त्यास पवन-पुत्राला जिंकता आले नाही. ॥ ५॥

दो०– ब्रह्म अस्त्र तेहि साँधा कपि मन कीन्ह बिचार।
जौं न ब्रह्मसर मानउँ महिमा मिटइ अपार ॥ १९ ॥

शेवटी त्याने ब्रह्मास्त्र उचलले. हनुमंताने विचार केला की जर मी ब्रह्मास्त्राचा मान ठेवला नाही, तर त्याची अपार महिमा नाहीशी होईल. ॥ १९॥

ब्रह्मबान कपि कहुँ तेहिं मारा। परतिहुँ बार कटकु संघारा ॥
तेहिं देखा कपि मुरुछित भयऊ। नागपास बाँधेसि लै गयऊ ॥ १ ॥

मेघनादाने हनुमंताला ब्रह्मबाण मारला. (त्याबरोबर तो झाडावरून खाली पडला.) परंतु पडता पडता त्याने बरीचशी सेना मारून टाकली. जेव्हा हनुमंत मूर्च्छित झाला आहे, असे मेघनादाला दिसले तेव्हा त्याने त्याला नागपाशाने बांधून नेले. ॥ १॥

जासु नाम जपि सुनहु भवानी। भव बंधन काटहिं नर ग्यानी ॥
तासु दूत कि बंध तरु आवा। प्रभु कारज लगि कपिहिं बँधावा ॥ २॥

(महादेव सांगतो) "हे भवानी, ज्याचे नाव जपल्यामुळे ज्ञानी मनुष्य संसाराचे (जन्म-मरणाचे) बंधन तोडून टाकतो, त्याचा दूत बंधनात सापडेल काय? परंतु प्रभू रामाच्या कार्यासाठी हनुमंताने स्वत:ला बंदी करून घेतले." ॥ २॥

कपि बंधन सुनि निसिचर धाए। कौतुक लागि सभाँ सब आए ॥
दसमुख सभा दीखि कपि जाई। कहि न जाइ कछु अति प्रभुताई ॥ ३ ॥

वानराला बंदी केले आहे, असे ऐकताच राक्षस धावून आले आणि कौतुकाने (गंमत पाहण्यासाठी) सभेमध्ये आले. हनुमानाने जाऊन रावणाची सभा पाहिली. तिचे ऐश्वर्य वर्णन करता येत नाही. ॥ ३॥

कर जोरें सुर दिसिप बिनीता । भृकुटि बिलोकत सकल सभीता ॥
देखि प्रताप न कपि मन संका । जिमि अहिगन महुँ गरुड़ असंका ॥ ४ ॥

देव व दिक्पाल हे हात जोडून व घाबरून विनम्रपणे रावणाच्या भुवयांकडे पाहात होते. रावणाचा हा प्रताप पाहून हनुमंताच्या मनाला जराही भीती वाटली नाही. ज्या प्रमाणे सर्पांच्या समूहात गरुड निःशंक असतो, त्या प्रमाणे हनुमान निर्भय उभा होता. ॥ ४ ॥

दो०– कपिहि बिलोकि दसानन बिहसा कहि दुर्बाद ।
सुत बध सुरति कीन्हि पुनि उपजा हृदयँ बिषाद ॥ २० ॥

हनुमानाला पाहून रावण त्याला शिव्या देत खूप हसला. मात्र पुत्र-वधाची आठवण होताच त्याच्या मनात विषाद उत्पन्न झाला. ॥२० ॥

कह लंकेस कवन तैं कीसा । केहि कें बल घालेहि बन खीसा ॥
की धौं श्रवन सुनेहि नहिं मोही । देखउँ अति असंक सठ तोही ॥ १ ॥

लंकापती रावणाने हनुमंताला म्हटले, 'अरे वानरा, तू कोण आहेस? कुणाच्या बळावर तू वन उजाड करून टाकलेस? तू कधी कानांनी माझे नाव व कीर्ती ऐकली नाहीस? अरे शठा, मला तू निर्ढावलेला दिसतोस. ॥ १ ॥

मारे निसिचर केहिं अपराधा । कहु सठ तोहि न प्रान कइ बाधा ॥
सुनु रावन ब्रह्मांड निकाया । पाइ जासु बल बिरचति माया ॥ २ ॥

कोणत्या अपराधासाठी तू राक्षसांना मारलेस? मूर्खा सांग, तुला प्राणाची भीती वाटत नाही काय?' तेव्हा हनुमंत म्हणाला, ' रावणा, ऐक. ज्याच्या बळावर माया ही संपूर्ण ब्रह्मांडांचे समूह निर्माण करते, ॥ २ ॥

जाकें बल बिरंचि हरि ईसा । पालत सृजत हरत दससीसा ॥
जा बल सीस धरत सहसानन । अंडकोस समेत गिरि कानन ॥ ३ ॥

हे दशानना, ज्याच्या बळावर ब्रह्मा, विष्णू व महेश हे सृष्टीचे सृजन, पालन व संहार करतात, ज्याच्या बळावर सहस्रमुखी शेष हा पर्वत व वनांसह संपूर्ण ब्रह्मांड शिरावर धारण करतो, ॥ ३ ॥

धरइ जो बिबिध देह सुरत्राता । तुम्ह से सठन्ह सिखावनु दाता ॥
हर कोदंड कठिन जेहिं भंजा । तेहि समेत नृप दल मद गंजा ॥ ४ ॥

जो देवांचे रक्षण करण्यासाठी नाना प्रकारचे देह धारण करतो, जो तुझ्यासारख्या

मूर्खांना धडा शिकवणारा आहे, ज्याने कठीण असे शिव-धनुष मोडले आणि त्याच बरोबर (जनक-सभेत) राजे लोकांची घमेंड उतरविली, ॥ ४ ॥

खर दूषन त्रिसिरा अरु बाली । बधे सकल अतुलित बलसाली ॥ ५ ॥

खर, दूषण, त्रिशिरा व वाली असे जे सर्व अतुलनीय बलवान होते, त्यांचा वध केला. ॥ ५ ॥

दो०– जाके बल लवलेस तें जितेहु चराचर झारि ।
तासु दूत मैं जा करि हरि आनेहु प्रिय नारि ॥ २१ ॥

ज्याच्या किंचितशा बळामुळे तू संपूर्ण चराचर सृष्टी जिंकली आहेस, ज्याच्या प्रिय पत्नीला तू हरण करून आणले आहेस, त्या प्रभू रामाचा मी दूत आहे. ॥ २१ ॥

जानउँ मैं तुम्हारि प्रभुताई । सहसबाहु सन परी लराई ॥
समर बालि सन करि जसु पावा । सुनि कपि बचन बिहसि बिहरावा ॥ १ ॥

तुझी प्रभुता काय आहे ती मला चांगली माहीत आहे. सहस्रार्जुनाशी तुझे युद्ध झाले होते आणि वालीशी युद्ध करून तू कीर्ती मिळविली होतीस.' (दोन्ही युद्धात तुझी नामुष्की झाली होती) हनुमंताचे मार्मिक शब्द ऐकून रावणाने हसण्यावारी नेले. ॥ १ ॥

खायउँ फल प्रभु लागी भूँखा । कपि सुभाव तें तोरेउँ रूखा ॥
सब कें देह परम प्रिय स्वामी । मारहिं मोहि कुमारग गामी ॥ २ ॥

'हे राक्षसांच्या स्वामी, मला भूक लागली होती, म्हणून फळे खाल्ली आणि वानराच्या स्वभावाप्रमाणे वृक्ष मोडले. हे राक्षसांच्या अधिपती, सर्वांना आपला देह फार प्रिय असतो. कुमार्गावर चालणारे (दुष्ट) राक्षस जेव्हा मला मारायला निघाले, ॥ २ ॥

जिन्ह मोहि मारा ते मैं मारे । तेहि पर बाँधेउँ तनयँ तुम्हारे ॥
मोहि न कछु बाँधे कइ लाजा । कीन्ह चहउँ निज प्रभु कर काजा ॥ ३ ॥

तेव्हा ज्यांनी मला मारले, त्यांना मीही मारले. त्यात तुझ्या पुत्राने मला बांधून घातले. मला बांधून घातल्याची काही लाज वाटत नाही. मी तर आपल्या प्रभूचे काम करू इच्छितो. ॥ ३ ॥

बिनती करउँ जोरि कर रावन । सुनहु मान तजि मोर सिखावन ॥
देखहु तुम्ह निज कुलहि बिचारी । भ्रम तजि भजहु भगत भय हारी ॥ ४ ॥

हे रावणा, मी तुला हात जोडून विनंती करतो, घमेंड सोडून माझा उपदेश ऐक, तू आपल्या पवित्र कुलाचा विचार करून बघ आणि भ्रम सोडून भक्तांचे भय दूर करणाऱ्या भगवंताचे भजन कर. ॥ ४ ॥

जाकें डर अति काल डेराई। जो सुर असुर चराचर खाई॥
तासों बयरु कबहुँ नहिं कीजै। मोरे कहें जानकी दीजै॥ ५॥

देव, राक्षस व सर्व चराचर यांना जो खाऊन टाकतो, तो काळसुद्धा ज्याच्या भीतीने अत्यंत घाबरतो, त्या प्रभूशी कधीही वैर धरू नकोस. माझ्या सांगण्याप्रमाणे सीतेला (परत) देऊन टाक. ॥ ५॥

दो०– प्रनतपाल रघुनायक करुना सिंधु खरारि।
गएँ सरन प्रभु राखिहैं तव अपराध बिसारि॥ २२॥

खर राक्षसाचा शत्रू श्रीराम हा शरणागताचे रक्षण करणारा आहे. तो करुणेचा सागर आहे. तू शरण गेल्यास तो प्रभू तुझे सर्व अपराध विसरून तुझे रक्षण करील. ॥२२॥

राम चरन पंकज उर धरहू। लंका अचल राजु तुम्ह करहू॥
रिषि पुलस्ति जसु बिमल मयंका। तेहि ससि महुँ जनि होहु कलंका॥ १॥

तू श्रीरामाचे चरण-कमल हृदयी धारण कर आणि लंकेचे अढळ राज्य कर. (तुझे वडील) ऋषी पुलस्त्य यांची कीर्ती निर्मळ चंद्राप्रमाणे आहे. त्या चंद्राला तू कलंक बनू नकोस. ॥१॥

राम नाम बिनु गिरा न सोहा। देखु बिचारि त्यागि मद मोहा॥
बसन हीन नहिं सोह सुरारी। सब भूषन भूषित बर नारी॥ २॥

रामनामाशिवाय वाणीला शोभा नाही. विचार करून मद आणि मोह सोडून दे. हे देवांच्या शत्रू रावणा, सर्व अलंकारांनी सजलेली सुंदर स्त्रीसुद्धा वस्त्रांशिवाय शोभून दिसत नाही. ॥ २॥

राम बिमुख संपति प्रभुताई। जाइ रही पाई बिनु पाई॥
सजल मूल जिन्ह सरितन्ह नाहीं। बरषि गएँ पुनि तबहिं सुखाहीं॥ ३॥

राम-विन्मुख असलेल्या पुरुषाला मिळालेली संपत्ती व प्रभुता या गोष्टी निघून जातात. त्यामुळे त्या मिळणे व न मिळणे हे सारखेच आहे. ज्या नद्यांना मूळ जलस्रोत नाहीत, (ज्या फक्त पावसावर अवलंबून आहेत.) त्या पाऊस गेल्यावर कोरड्या पडतात. ॥ ३॥

सुनु दसकंठ कहउँ पन रोपी। बिमुख राम त्राता नहिं कोपी॥
संकर सहस बिष्नु अज तोही। सकहिं न राखि राम कर द्रोही॥ ४॥

हे रावणा, ऐक. मी प्रतिज्ञेपूर्वक सांगतो की राम-विन्मुख झालेल्याचे रक्षण करणारा कोणीही नाही. हजारो शंकर, विष्णू व ब्रह्मदेव हेसुद्धा श्रीरामाशी द्रोह करणाऱ्या तुला वाचवू शकणार नाहीत. ॥ ४॥

दो०– मोहमूल बहु सूल प्रद त्यागहु तम अभिमान ।
भजहु राम रघुनायक कृपा सिंधु भगवान ॥ २३ ॥

मोह हाच ज्याच्या मुळाशी आहे, असा अत्यंत दुःखदायक तमरूप अभिमान सोडून दे आणि रघुकुलनायक व कृपा-सिंधू असलेल्या श्रीरामाचे भजन कर.' ॥२३॥

जदपि कही कपि अति हित बानी। भगति बिबेक बिरति नय सानी ॥
बोला बिहसि महा अभिमानी। मिला हमहि कपि गुर बड़ ग्यानी ॥ १ ॥

हनुमंत जरी भक्ती, वैराग्य व नीती यांनी परिपूर्ण वाणी बोलला, तरी तो अत्यंत अभिमानी रावण हसून (टोचून) बोलला की, 'आम्हांला हा वानर मोठा ज्ञानी गुरू म्हणून भेटला. ॥ १ ॥

मृत्यु निकट आई खल तोही। लागेसि अधम सिखावन मोही ॥
उलटा होइहि कह हनुमाना। मतिभ्रम तोर प्रगट मैं जाना ॥ २ ॥

अरे दुष्टा, (वानरा) तुझा मृत्यू जवळ आला आहे, (म्हणून) हे अधमा, तू मला उपदेश देऊ लागला आहेस?' तेव्हा हनुमंत म्हणाला, 'याच्या उलट होईल. (तुझा मृत्यू जवळ आला आहे, माझा नव्हे.) तुझ्या बुद्धीला भ्रम झाला आहे, हे मला आता प्रत्यक्ष कळले आहे.' ॥२॥

सुनि कपि बचन बहुत खिसिआना। बेगि न हरहु मूढ़ कर प्राना ॥
सुनत निसाचर मारन धाए। सचिवन्ह सहित बिभीषनु आए ॥ ३ ॥

हनुमानाचे बोलणे ऐकून रावण संतापला आणि (आपल्या लोकांना) म्हणाला, 'अरे, या मूर्खाचा प्राण तत्काळ का घेत नाही?' हे ऐकताच राक्षस हनुमंताला मारण्यास धावले. इतक्यात बिभीषण हा (आपल्या) मंत्र्यांसह तेथे आला. ॥ ३ ॥

नाइ सीस करि बिनय बहूता। नीति बिरोध न मारिअ दूता ॥
आन दंड कछु करिअ गोसाँई। सबहीं कहा मंत्र भल भाई ॥ ४ ॥

त्याने रावणापुढे मस्तक नम्र करून फार विनवणी केली की, 'दूताला ठार मारणे हे नीतीच्या विरोधी आहे. स्वामी, याला दुसरी काही शिक्षा द्या.' त्यावर सर्वजण म्हणाले की, 'हा सल्ला उत्तम आहे.' ॥४॥

सुनत बिहसि बोला दसकंधर। अंग भंग करि पठइअ बंदर ॥ ५ ॥

ते ऐकून रावण हसून म्हणाला की, 'ठीक आहे, या वानराचे अवयव तोडून त्याला परत पाठवून द्या. ॥ ५ ॥

दो०– कपि कें ममता पूँछ पर सबहि कहउँ समुझाइ ।
तेल बोरि पट बाँधि पुनि पावक देहु लगाइ ॥ २४ ॥

मी सर्वांना समजावून सांगतो की, वानराची आपल्या शेपटीवर फार ममता असते. तेव्हा तेलामध्ये कापड बुडवून त्याच्या शेपटीला गुंडाळा व आग लावून द्या. ॥ २४ ॥

पूँछहीन बानर तहँ जाइहि । तब सठ निज नाथहि लइ आइहि ॥
जिन्ह कै कीन्हिसि बहुत बड़ाई । देखउँ मैं तिन्ह कै प्रभुताई ॥ १ ॥

हा मूर्ख वानर शेपटीविना तिथे जाईल व आपल्या स्वामीला घेऊन येईल. याने ज्याची मोठी प्रशंसा केली आहे, त्याचे सामर्थ्य तरी मला पाहू दे.' ॥ १ ॥

बचन सुनत कपि मन मुसुकाना । भइ सहाय सारद मैं जाना ॥
जातुधान सुनि रावन बचना । लागे रचैं मूढ़ सोइ रचना ॥ २ ॥

रावणाचे हे बोलणे ऐकून हनुमान हसला. तो मनात म्हणाला की, 'अशी बुद्धी याला देण्यास सरस्वतीने मदत केली आहे.' रावणाचे ऐकून मूर्ख राक्षस तशी (शेपटीला आग लावण्याची) तयारी करू लागले. ॥ २ ॥

रहा न नगर बसन घृत तेला । बाढ़ी पूँछ कीन्ह कपि खेला ॥
कौतुक कहँ आए पुरबासी । मारहिं चरन करहिं बहु हाँसी ॥ ३ ॥

(शेपटीला इतके कपडे गुंडाळले आणि त्यावर इतके तेल व तूप ओतले की,) लंका नगरीत कपडे, तूप व तेल उरले नाही. हनुमानाने आपली शेपटी लांब केली. सर्व नागरिक ही गंमत पाहायला आले. ते त्याला पायाने लाथा मारून खूप हसत होते. ॥ ३ ॥

बाजहिं ढोल देहिं सब तारी । नगर फेरि पुनि पूँछ प्रजारी ॥
पावक जरत देखि हनुमंता । भयउ परम लघुरूप तुरंता ॥ ४ ॥

ते ढोल वाजवून टाळ्या पिटत होते. त्याला नगरातून फिरवून त्यांनी त्याच्या शेपटीला आग लावली. आग पेटलेली पाहून हनुमानाने लगेच छोटे रूप धारण केले. ॥ ४ ॥

निबुकि चढ़ेउ कपि कनक अटारीं । भईं सभीत निसाचर नारीं ॥ ५ ॥

बंधनातून मुक्त होऊन हनुमान (लंकेच्या) सुवर्ण गच्चीवर चढला. राक्षस-स्त्रिया ते पाहून भयभीत झाल्या. ॥ ५ ॥

दो०– हरि प्रेरित तेहि अवसर चले मरुत उनचास ।
अट्टहास करि गर्जा कपि बढ़ि लाग अकास ॥ २५ ॥

त्या वेळी भगवंताच्या प्रेरणेने ४९ प्रकारचे वारे जोराने वाहू लागले. मग हनुमानाने मोठ्याने हसून गर्जना केली व तो आकाशाला जाऊन भिडला. ॥ २५ ॥

देह बिसाल परम हरुआई। मंदिर तें मंदिर चढ़ धाई॥
जरइ नगर भा लोग बिहाला। झपट लपट बहु कोटि कराला॥ १॥

त्याचे शरीर फार विशाल असूनही फार हलके होते. तो घराघरावर चढून धावू लागला. नगर जळू लागले, तेव्हा लोक व्याकूळ होऊन गेले. आगीच्या कोटयवधी ज्वाळा वेढू लागल्या. ॥ १॥

तात मातु हा सुनिअ पुकारा। एहिं अवसर को हमहि उबारा॥
हम जो कहा यह कपि नहिं होई। बानर रूप धरें सुर कोई॥ २॥

'बाप रे, आई गं, आता या प्रसंगी आमचे रक्षण कोण करणार?' असा ओरडा ऐकू येत होता. 'आम्ही पूर्वीच सांगितले होते की हा वानर नसून वानराचे रूप धारण करून एखादा देव आला आहे. ॥ २॥

साधु अवग्या कर फलु ऐसा। जरइ नगर अनाथ कर जैसा॥
जारा नगरु निमिष एक माहीं। एक बिभीषन कर गृह नाहीं॥ ३॥

हा सर्व साधूचा अपमान केल्याचा परिणाम आहे. नगर एखाद्या अनाथाच्या पराप्रमाणे जळत आहे.' हनुमंताने एका क्षणात नगर जाळून टाकले. फक्त बिभीषणाचे तेवढे घर जाळले नाही. ॥ ३॥

ता कर दूत अनल जेहिं सिरिजा। जरा न सो तेहि कारन गिरिजा॥
उलटि पलटि लंका सब जारी। कूदि परा पुनि सिंधु मझारी॥ ४॥

(महादेव पार्वतीला म्हणतात,) 'पार्वती, ज्याने अग्नी निर्माण केला त्याचा (श्रीरामाचा) दूत हनुमंत होता, म्हणून आगीने हनुमंत काही भाजला नाही. त्याने आलटून-पालटून (एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत) सर्व लंका जाळून टाकली आणि मग समुद्रात उडी मारली. ॥ ४॥

दो०– पूँछ बुझाइ खोइ श्रम धरि लघु रूप बहोरि।
जनकसुता कें आगें ठाढ़ भयउ कर जोरि॥ २६॥

शेपटी विझविली आणि थकवा दूर करून पुन्हा लहान रूप धारण केले. मग तो हात जोडून सीतेसमोर जाऊन उभा राहिला. ॥ २६॥

मातु मोहि दीजे कछु चीन्हा। जैसें रघुनायक मोहि दीन्हा॥
चूड़ामनि उतारि तब दयऊ। हरष समेत पवनसुत लयऊ॥ १॥

तो म्हणाला, 'माते, ज्या प्रमाणे श्रीरामाने ओळखीसाठी खूण दिली होती,

त्या प्रमाणे मला काही दे.' (ते ऐकून) सीतेने आपला चूडामणी काढून दिला. तो पवनसुताने आनंदाने घेतला. ॥ १ ॥

कहेहु तात अस मोर प्रनामा। सब प्रकार प्रभु पूरनकामा॥
दीन दयाल बिरिदु संभारी। हरहु नाथ मम संकट भारी॥ २॥

सीता म्हणाली, 'हे तात, श्रीरामाला माझा प्रणाम निवेदन करून सांग की, हे प्रभू, तू सर्व प्रकारे पूर्णकाम आहेस, परंतु दीनांवर दया करणे, हे तुझे ब्रीद आहे. (मी आज दीन आहे,) तेव्हा आपले ब्रीद आठवून हे नाथा, माझ्यावरचे हे मोठे संकट दूर कर. ॥२॥

तात सक्रसुत कथा सुनाएहु। बान प्रताप प्रभुहि समुझाएहु॥
मास दिवस महुँ नाथु न आवा। तौ पुनि मोहि जिअत नहिं पावा॥ ३॥

हे तात, तू श्रीरामाला इंद्र-पुत्र जयंताची घटना सांग. तसेच प्रभूला त्याच्या स्वत:च्या बाणाचा प्रताप समजावून दे. (आठवण करून दे.) जर एक महिन्याभरात नाथ आला नाही, तर मी काही जिवंत सापडणार नाही. ॥ ३॥

कहु कपि केहि बिधि राखौं प्राना। तुम्हहू तात कहत अब जाना॥
तोहि देखि सीतलि भइ छाती। पुनि मो कहुँ सोइ दिनु सो राती॥ ४॥

हे हनुमंता, मी आपले प्राण कसे राखू ते सांग? तात, तूसुद्धा आता जातो, असे म्हणत आहेस. तुला पाहून मन शांत झाले होते. आता मला तोच (दु:खपूर्ण) दिवस आणि तीच रात्र.' ॥४॥

दो०– जनकसुतहि समुझाइ करि बहु बिधि धीरजु दीन्ह।
चरन कमल सिरु नाइ कपि गवनु राम पहिं कीन्ह॥ २७॥

हनुमंताने सीतेला समजावले आणि अनेक प्रकारे धीर दिला. नंतर तिच्या चरणांवर मस्तक ठेवून त्याने श्रीरामाकडे प्रयाण केले. ॥ २७॥

चलत महाधुनि गर्जेसि भारी। गर्भ स्रवहिं सुनि निसिचर नारी॥
नाघि सिंधु एहि पारहि आवा। सबद किलिकिला कपिन्ह सुनावा॥ १॥

जाताना त्याने मोठी गर्जना केली, ते ऐकून राक्षस स्त्रियांचे गर्भपात होऊ लागले. समुद्र पार करून तो अलीकडच्या तटावर आला आणि त्याने वानरांना किलकिल असा हर्षध्वनी ऐकविला. ॥ १॥

हरषे सब बिलोकि हनुमाना। नूतन जन्म कपिन्ह तब जाना॥
मुख प्रसन्न तन तेज बिराजा। कीन्हेसि रामचंद्र कर काजा॥ २॥

हनुमानाला पाहून सर्वजण आनंदित झाले, त्यांना आपला नवा जन्म झाल्यासारखे वाटले. (हनुमानाचे) मुख आनंदित आहे आणि त्याचा देह तेजस्वी आहे, असे पाहून त्यांना समजून चुकले की, हा श्रीरामाचे काम फत्ते करून आला आहे. ॥ २॥

मिले सकल अति भए सुखारी। तलफत मीन पाव जिमि बारी॥
चले हरषि रघुनायक पासा। पूँछत कहत नवल इतिहासा॥ ३॥

हनुमंताला भेटल्यामुळे ते सर्व सुखी झाले, जणू तडफडणाऱ्या माश्यांना पाणी मिळाले. सर्वजण नवनवीन वृत्तांत विचारत-सांगत आनंदाने श्रीरामाकडे निघाले. ॥ ३॥

तब मधुबन भीतर सब आए। अंगद संमत मधु फल खाए॥
रखवारे जब बरजन लागे। मुष्टि प्रहार हनत सब भागे॥ ४॥

तेव्हा ते सर्वजण मधुवनात आले आणि अंगदाच्या संमतीने तेथील मध व फळे खाऊ लागले. (मधुवनाच्या) रखवालदारांनी त्यांना अडविले तेव्हा वानरांनी त्यांना गुद्दे मारले, मग ते पळून गेले. ॥ ४॥

दो०– जाइ पुकारे ते सब बन उजार जुबराज।
सुनि सुग्रीव हरष कपि करि आए प्रभु काज॥ २८॥

(सुग्रीवाकडे जाऊन) सर्व रखवालदारांनी ओरडा केला की, 'युवराज अंगद हा मधुवनाचा विध्वंस करीत आहे.' ते ऐकून सुग्रीव आनंदाने म्हणाला की, 'प्रभू रामाचे काम फत्ते करून वानर आले आहेत.' ॥ २८॥

जौं न होति सीता सुधि पाई। मधुबन के फल सकहिं कि खाई॥
एहि बिधि मन बिचार कर राजा। आइ गए कपि सहित समाजा॥ १॥

जर सीतेचा शोध लागला नसता तर ते (वानर) मधुवनातील फळे खाऊ शकले असते का? असा विचार सुग्रीव मनात करीत होता, एवढ्यात वानर सर्व समाजासह आले. ॥१॥

आइ सबन्हि नावा पद सीसा। मिलेउ सबन्हि अति प्रेम कपीसा॥
पूँछी कुसल कुसल पद देखी। राम कृपाँ भा काजु बिसेषी॥ २॥

सर्वांनी येऊन सुग्रीवाच्या चरणांवर मस्तक ठेवले. कपिराज सुग्रीव प्रेमाने

सर्वांना भेटला, आणि त्याने क्षेम-कुशल विचारले, तेव्हा ते म्हणाले की, 'तुझ्या चरणांचे दर्शन घडल्यामुळे आता सर्व क्षेमकुशल आहे. रामाच्या कृपेमुळे कार्यात विशेष यश मिळाले. ॥ २ ॥

नाथ काजु कीन्हेउ हनुमाना। राखे सकल कपिन्ह के प्राना॥
सुनि सुग्रीव बहुरि तेहि मिलेऊ। कपिन्ह सहित रघुपति पहिं चलेऊ॥ ३॥

हे स्वामी, हनुमंतानेच सर्व काम केले आणि सर्व वानरांचे प्राण वाचविले.' हे ऐकून सुग्रीव हनुमंताला पुन्हा भेटला. सर्व जण वानरांसमवेत श्रीरामाकडे निघाले. ॥ ३ ॥

राम कपिन्ह जब आवत देखा। किएँ काजु मन हरष बिसेषा॥
फटिक सिला बैठे द्वौ भाई। परे सकल कपि चरनन्हि जाई॥ ४॥

काम पूर्ण करून आलेल्या वानरांना पाहून श्रीरामाला मनात आनंद झाला. (राम-लक्ष्मण) दोघे बंधू स्फटिकाच्या शिळेवर बसले होते. सर्व वानर त्यांच्या पाया पडले. ॥ ४ ॥

दो०– प्रीति सहित सब भेंटे रघुपति करुना पुंज।
पूँछी कुसल नाथ अब कुसल देखि पद कंज॥ २९॥

करुणानिधी श्रीराम मोठ्या प्रेमाने आलिंगन देऊन सर्वांना भेटले आणि त्याने क्षेम-कुशल विचारले. (वानर म्हणाले) 'हे नाथा, तुझ्या चरण-कमलांचे दर्शन झाल्यामुळे सर्व क्षेम आहे.' ॥ २९ ॥

जामवंत कह सुनु रघुराया। जा पर नाथ करहु तुम्ह दाया॥
ताहि सदा सुभ कुसल निरंतर। सुर नर मुनि प्रसन्न ता ऊपर॥ १॥

जांबुवंत म्हणाला, 'हे रघुनाथा, ऐक. ज्यावर तुम्ही दया करतात, त्याचे नेहमीच कल्याण व क्षेम असते. देव, मनुष्य व मुनी हे सर्वजण त्याच्यावर प्रसन्न असतात. ॥ १ ॥

सोइ बिजई बिनई गुन सागर। तासु सुजसु त्रैलोक उजागर॥
प्रभु कीं कृपा भयउ सबु काजू। जन्म हमार सुफल भा आजू॥ २॥

(असा दयाप्राप्त) तोच विजयी होय. तोच विनयी व तोच गुण-सागर बनून जातो. त्याची ख्याती त्रैलोक्यात पसरते. प्रभूच्या कृपेमुळे सर्व कार्य यशस्वी झाले. आज आमचा जन्म सफल झाला. ॥ २ ॥

नाथ पवनसुत कीन्हि जो करनी। सहसहुँ मुख न जाइ सो बरनी॥
पवनतनय के चरित सुहाए। जामवंत रघुपतिहि सुनाए॥ ३॥

हे नाथा, पवनसुत हनुमानाने जे केले आहे, ते सहस्र मुखांनीही वर्णन करता येत नाही.' मग जांबुवंताने हनुमानाचे सुंदर चरित्र (कार्य) रघुनाथाला ऐकवले. ॥ ३ ॥

सुनत कृपानिधि मन अति भाए। पुनि हनुमान हरषि हियँ लाए॥
कहहु तात केहि भाँति जानकी। रहति करति रच्छा स्वप्रान की॥ ४॥

ते ऐकून कृपानिधी श्रीरामाच्या मनाला खूप आवडले. त्याने हनुमंताला मोठ्या प्रेमाने पुन्हा आलिंगन दिले. तो म्हणाला, 'हे तात, सीता कशी राहात आहे व आपल्या प्राणांचे रक्षण कसे करीत आहे?' ॥ ४॥

दो०– नाम पाहरू दिवस निसि ध्यान तुम्हार कपाट।
लोचन निज पद जंत्रित जाहिं प्रान केहिं बाट॥ ३०॥

हनुमंत म्हणाला, 'रामा, तुझे नावच रात्रंदिवस पहारा देणारे आहे आणि तुझे ध्यान हेच दरवाजा आहे. (सीतेचे) नेत्र तुझ्या चरणी लागलेले असतात. तेच कुलूप होय. मग प्राण कोणत्या वाटेने जाणार ? ॥ ३०॥

चलत मोहि चूड़ामनि दीन्ही। रघुपति हृदयँ लाइ सोइ लीन्ही॥
नाथ जुगल लोचन भरि बारी। बचन कहे कछु जनककुमारी॥ १॥

येताना तिने मला आपला चूडामणी दिला आहे.' रघुनाथाने तो घेऊन आपल्या हृदयाशी धरला. (हनुमान पुढे म्हणाला,) 'हे नाथ, जनककुमारी सीता ही दोन्ही डोळ्यांत पाणी आणून म्हणाली, ॥१॥

अनुज समेत गहेहु प्रभु चरना। दीन बंधु प्रनतारति हरना॥
मन क्रम बचन चरन अनुरागी। केहिं अपराध नाथ हौं त्यागी॥ २॥

छोटा भाऊ लक्ष्मणाबरोबरच प्रभू श्रीरामाचे चरण धरून सांग की, हे दीनबंधू, तू शरणागताचे दुःख हरण करणारा आहेस. मी मन, वचन व कर्माने तुझ्या चरणांची अनुरागिनी आहे. मग तू कोणत्या अपराधासाठी माझा त्याग केलास ? ॥ २॥

अवगुन एक मोर मैं माना। बिछुरत प्रान न कीन्ह पयाना॥
नाथ सो नयननि को अपराधा। निसरत प्रान करहिं हठि बाधा॥ ३॥

तुझा विरह होताच प्राण निघून गेले नाहीत, हा माझ्यात दोष आहे असे मी मानते. परंतु हे नाथा, हा माझ्या नेत्रांचा अपराध आहे, ते प्राण जाण्यामध्ये मुद्दाम बाधा आणतात. (नेत्रांना दर्शनाची आस लागून राहिली आहे.) ॥३॥

बिरह अगिनि तनु तूल समीरा। स्वास जरइ छन माहिं सरीरा॥
नयन स्रवहिं जलु निज हित लागी। जरैं न पाव देह बिरहागी॥ ४॥

विरहाचा अग्नी जळत आहे, शरीर कापूस झाले आहे आणि श्वास हा वारा

बनून अग्नीला प्रज्वलित करीत आहे. त्यामुळे हे शरीर एका क्षणात जळून जाईल. परंतु माझे नेत्र (प्रभूचे दर्शन घेऊन सुखी होण्याच्या) आपल्या हितासाठी अश्रु-जल डाळत आहेत. त्यामुळे विरहाग्नीने शरीर जळून जात नाही. ॥ ४॥

सीता कै अति बिपति बिसाला। बिनहिं कहें भलि दीनदयाला॥ ५॥

हे दीनदयाळ श्रीरामा, सीतामाईवर मोठी विपत्ती आली आहे. त्याबद्दल न सांगणे हेच बरे. (सांगितल्यास तुला क्लेश होतील.) ॥ ५॥

दो०– निमिष निमिष करुनानिधि जाहिं कलप सम बीति।
बेगि चलिअ प्रभु आनिअ भुज बल खल दल जीति॥ ३१॥

हे करुणानिधी, तिचा एक एक क्षण कल्पाप्रमाणे जात आहे. म्हणून हे प्रभू, लगेच निघ व आपल्या बाहुबलाने दुष्ट-सैन्याचे निर्दालन करून सीतामाईला घेऊन ये.' ॥ ३१॥

सुनि सीता दुख प्रभु सुख अयना। भरि आए जल राजिव नयना॥
बचन कायँ मन मम गति जाही। सपनेहुँ बूझिअ बिपति कि ताही॥ १॥

सीतेचे दुःख ऐकून सुखाचे धाम असलेल्या प्रभूचे कमल-नेत्र अश्रूंनी भरले. प्रभू राम म्हणाला, 'मन, वचन व शरीराने जिला माझीच गती (आश्रय) आहे, स्वप्नात तरी तिच्यावर विपत्ती येईल काय ?' ॥१॥

कह हनुमंत बिपति प्रभु सोई। जब तव सुमिरन भजन न होई॥
केतिक बात प्रभु जातुधान की। रिपुहि जीति आनिबी जानकी॥ २॥

तेव्हा हनुमान म्हणाला, 'हे प्रभू, जेव्हा तुझे स्मरण व भजन होत नाही, तेव्हा तीच विपत्ती असते. राक्षसांची गोष्ट ती काय मोठी? तू शत्रूंना जिंकून जानकीमाईला घेऊन येशील.' ॥ २॥

सुनु कपि तोहि समान उपकारी। नहिं कोउ सुर नर मुनि तनुधारी॥
प्रति उपकार करौं का तोरा। सनमुख होइ न सकत मन मोरा॥ ३॥

तेव्हा श्रीराम म्हणाला, 'हनुमंता, ऐक. तुझ्यासारखा माझ्यावर उपकार करणारा देव, मनुष्य किंवा मुनी असा कोणीही शरीर धारण करणारा नाही. तुझ्या उपकाराची परत फेड कशी करू? माझे मनसुद्धा तुझ्यासमोर संकोचत आहे. ॥ ३॥

सुनु सुत तोहि उरिन मैं नाहीं। देखेउँ करि बिचार मन माहीं॥
पुनि पुनि कपिहि चितव सुरत्राता। लोचन नीर पुलक अति गाता॥ ४॥

हे पुत्रा, मी मनात विचार करून पाहिला परंतु मी तुझ्या ऋणातून मुक्त होऊ

शकत नाही.' देवांचा रक्षक प्रभू राम हा वारंवार हनुमंताकडे पाहात होता. त्याच्या नेत्रांत पाणी आले होते व शरीर पुलकित होत होते. ॥ ४ ॥

दो०– सुनि प्रभु बचन बिलोकि मुख गात हरषि हनुमंत ।
चरन परेउ प्रेमाकुल त्राहि त्राहि भगवंत ॥ ३२ ॥

प्रभू श्रीरामाचे वचन ऐकून आणि त्याचे मुख व पुलकित शरीर पाहून हनुमान हर्षित झाला. प्रेमाने व्याकूळ होऊन 'हे भगवंता, माझे रक्षण कर. माझे रक्षण कर.' असे म्हणत त्याने श्रीरामाच्या चरणांवर लोटांगण घातले. ॥ ३२ ॥

बार बार प्रभु चहइ उठावा । प्रेम मगन तेहि उठब न भावा ॥
प्रभु कर पंकज कपि कें सीसा । सुमिरि सो दसा मगन गौरीसा ॥ १ ॥

श्रीराम हा हनुमंताला वारंवार उठवू पाहात होता, परंतु प्रेम-मग्न झालेल्या हनुमंताला प्रभु-चरणांवरून उठायची इच्छा होत नव्हती. प्रभूचे कर-कमल हनुमंताच्या शिरावर होते. (भक्त व प्रभू यांच्या त्या स्थितीचे) स्मरण होताच शिवसुद्धा भक्ति-मग्न होऊन गेला. ॥ १ ॥

सावधान मन करि पुनि संकर । लागे कहन कथा अति सुंदर ॥
कपि उठाइ प्रभु हृदयँ लगावा । कर गहि परम निकट बैठावा ॥ २ ॥

मग मनाला सावध करून शंकर (पुढील) सुंदर कथा सांगू लागले. 'हनुमंताला उठवून श्रीरामाने हृदयाशी कवटाळले आणि त्याचा हात धरून आपल्या अगदी जवळ बसविले.' ॥ २ ॥

कह कपि रावन पालित लंका । केहि बिधि दहेउ दुर्ग अति बंका ॥
प्रभु प्रसन्न जाना हनुमाना । बोला बचन बिगत अभिमाना ॥ ३ ॥

श्रीराम म्हणाला, 'हे हनुमंता, रावणाने सुरक्षित ठेवलेली लंका व तेथील अवघड किल्ले तू कसे बरे जाळून टाकलेस?' प्रभू प्रसन्न आहे, हे पाहून हनुमान अभिमानरहित होऊन म्हणाला, ॥ ३ ॥

साखामृग कै बड़ि मनुसाई । साखा तें साखा पर जाई ॥
नाघि सिंधु हाटकपुर जारा । निसिचर गन बधि बिपिन उजारा ॥ ४ ॥

'एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारणे हाच तर वानराचा पुरुषार्थ असतो. मी समुद्र ओलांडून सुवर्ण नगरी लंका जाळून टाकली आणि राक्षसांना मारून टाकून अशोकवन उध्वस्त केले. ॥ ४ ॥

सो सब तव प्रताप रघुराई। नाथ न कछू मोरि प्रभुताई॥ ५॥

हे श्रीरामा, हा सर्व तुझाच प्रताप आहे. यात माझा कोणताही मोठेपणा नाही. ॥ ५॥

दो०– ता कहुँ प्रभु कछु अगम नहिं जा पर तुम्ह अनुकूल।
तव प्रभावँ बड़वानलहि जारि सकइ खलु तूल॥ ३३॥

हे प्रभू, तू ज्याच्यावर प्रसन्न होशील, त्याला कोणतीही गोष्ट अशक्य नाही. तुझ्या प्रभावामुळे कापूसही (लवकर जळून जाणारी वस्तू) वडवानलाला निश्चितच जाळून टाळू शकेल. (अशक्य गोष्ट शक्य होईल.) ॥३३॥

नाथ भगति अति सुखदायनी। देहु कृपा करि अनपायनी॥
सुनि प्रभु परम सरल कपि बानी। एवमस्तु तब कहेउ भवानी॥ १॥

हे नाथा, अत्यंत सुख देणारी तुझी दृढ भक्ती मला कृपा करून दे.' (शंकर म्हणतात) 'हे भगवती, हनुमानाची ती अत्यंत सरळ वाणी ऐकून (श्रीराम) म्हणाला, 'एवमस्तु' (असेच होवो.) ॥ १॥

उमा राम सुभाउ जेहिं जाना। ताहि भजनु तजि भाव न आना॥
यह संबाद जासु उर आवा। रघुपति चरन भगति सोइ पावा॥ २॥

हे उमे, श्रीरामाचा स्वभाव जो जाणतो, त्याला भजन सोडून इतर काही आवडत नाही. हा स्वामी आणि सेवकाचा संवाद ज्याच्या मनात ठसतो, त्याला श्रीरामाच्या चरणांची भक्ती प्राप्त होते. '॥ २॥

सुनि प्रभु बचन कहहिं कपिबृंदा। जय जय जय कृपाल सुखकंदा॥
तब रघुपति कपिपतिहि बोलावा। कहा चलैं कर करहु बनावा॥ ३॥

प्रभू श्रीरामाचे वचन ऐकून वानरगण म्हणू लागले की, 'आनंदकंद कृपाळू श्रीरामाचा विजय असो.' तेव्हा रघुपतीने कपिराज सुग्रीवाला बोलावून सांगितले की, 'निघण्याची तयारी करा. ॥ ३॥

अब बिलंबु केहि कारन कीजे। तुरत कपिन्ह कहुँ आयसु दीजे॥
कौतुक देखि सुमन बहु बरषी। नभ तें भवन चले सुर हरषी॥ ४॥

आता उशीर कशासाठी करायचा? वानरांना त्वरित आज्ञा दे.' श्रीरामाची ही लीला (रावणवधाची तयारी) पाहून देवांनी आकाशातून पुष्प-वर्षा केली आणि ते आनंदाने आपापल्या लोकी परतले. ॥ ४॥

दो०– कपिपति बेगि बोलाए आए जूथप जूथ।
नाना बरन अतुल बल बानर भालु बरूथ ॥ ३४ ॥

सुग्रीवाने लगेच वानरांना बोलविले. सेनानायकांचे समूह उपस्थित झाले. नाना रंगांचे आणि अतुलनीय बलशाली वानर व अस्वलांचे ते समूह होते. ॥ ३४ ॥

प्रभु पद पंकज नावहिं सीसा। गर्जहिं भालु महाबल कीसा॥
देखी राम सकल कपि सेना। चितइ कृपा करि राजिव नैना॥ १॥

प्रभु-चरणांवर नतमस्तक होऊन महाबलवान वानर व अस्वले गर्जना करीत होती. श्रीरामाने ती सर्व वानर-सेना पाहिली आणि आपल्या कमल-नेत्रांची कृपा-दृष्टी त्यांच्यावर टाकली. ॥ १ ॥

राम कृपा बल पाइ कपिंदा। भए पच्छजुत मनहुँ गिरिंदा॥
हरषि राम तब कीन्ह पयाना। सगुन भए सुंदर सुभ नाना॥ २॥

राम-कृपेचे बळ प्राप्त झाल्यामुळे ते वानर जणू पंखयुक्त पर्वतांप्रमाणे मोठे झाले. मग श्रीरामाने हर्षित होऊन प्रस्थान केले. त्या वेळी नाना प्रकारचे शुभशकून होऊ लागले. ॥ २ ॥

जासु सकल मंगलमय कीती। तासु पयान सगुन यह नीती॥
प्रभु पयान जाना बैदेहीं। फरकि बाम अँग जनु कहि देहीं॥ ३॥

ज्याची कीर्ती सर्व प्रकारच्या मांगल्यांनी परिपूर्ण आहे, त्याच्या प्रस्थानाचे वेळी शुभ शकून होणे, ही नीतीच आहे. प्रभू रामाचे प्रस्थान झाले आहे, हे जानकीला जाणवले. तिची वामांगे फडकून जणू सांगत होती की श्रीराम येत आहे. ॥ ३ ॥

जोइ जोइ सगुन जानकिहि होई। असगुन भयउ रावनहि सोई॥
चला कटकु को बरनैं पारा। गर्जहिं बानर भालु अपारा॥ ४॥

जानकीला जसजसे शुभ शकून होऊ लागले, तसतसे रावणाला अपशकून होऊ लागले. श्रीरामाची सेना निघाली. तिचे वर्णन कोण करू शकेल? असंख्य वानर व अस्वले गर्जना करीत निघाली होती. ॥ ४ ॥

नख आयुध गिरि पादपधारी। चले गगन महि इच्छाचारी॥
केहरिनाद भालु कपि करहीं। डगमगाहिं दिग्गज चिक्करहीं॥ ५॥

नखे हीच ज्यांची शस्त्रे आहेत असे वानर व अस्वले, पर्वत व वृक्ष उचलून

आकाशातून स्वेच्छेने संचार करू लागले. ते सिंह-नाद करीत होते. (त्यांच्या चालण्यामुळे व गर्जनेमुळे) दिग्गज डळमळू लागले व चित्कार करू लागले. ॥ ५ ॥

छं०– चिक्करहिं दिग्गज डोल महि गिरि लोल सागर खरभरे।
मन हरष सभ गंधर्ब सुर मुनि नाग किंनर दुख टरे॥
कटकटहिं मर्कट बिकट भट बहु कोटि कोटिन्ह धावहीं।
जय राम प्रबल प्रताप कोसलनाथ गुन गन गावहीं॥ १॥

दिग्गज चित्कार करू लागले, पृथ्वी डगमगू लागली, पर्वत चंचल झाले, (कापू लागले.) समुद्र खळबळू लागला. गंधर्व, देव, मुनी, नाग, किन्नर- सर्वजणांना आनंद झाला की आता आमची दुःखे दूर झाली. अनेक कोटी भयानक वानर-योद्धे कडकडाट करीत होते, तर कोट्यवधी धावून जात होते. प्रबल प्रतापी श्रीरामाचा विजय असो, अशी ते गर्जना करीत त्याच्या गुणांचे गान करीत होते. ॥ १ ॥

सहि सक न भार उदार अहिपति बार बारहिं मोहई।
गह दसन पुनि पुनि कमठ पृष्ट कठोर सो किमि सोहई॥
रघुबीर रुचिर प्रयान प्रस्थिति जानि परम सुहावनी।
जनु कमठ खर्पर सर्पराज सो लिखत अबिचल पावनी॥ २॥

उदार (श्रेष्ठ व महान) सर्पराज शेषाला श्रीराम-सेनेचा भार सहन होईना. तो वारंवार मोहित होत होता. (घाबरून जात होता) तो वारंवार कच्छपाच्या कठोर पाठीला दातांनी पकडत होता. (वारंवार आपले दात कच्छपाच्या पाठीवर घुसवून तो तेथे रेषा ओढत होता.) असे करताना तो असा काही शोभत होता की जणू तो शेष श्रीरामाची ही सुंदर प्रस्थान-यात्रा समजून तिची अचल पवित्र कथा कच्छपाच्या पाठीवर लिहीत होता. ॥ २ ॥

दो०– एहि बिधि जाइ कृपानिधि उतरे सागर तीर।
जहँ तहँ लागे खान फल भालु बिपुल कपि बीर॥ ३५॥

अशा प्रकारे कृपानिधी श्रीराम समुद्र-तटावर जाऊन पोहोचला. अनेक वानर व अस्वल वीर हे तिकडे-तिकडे फळे खाऊ लागले. ॥ ३५ ॥

उहाँ निसाचर रहहिं ससंका। जब तें जारि गयउ कपि लंका॥
निज निज गृहँ सब करहिं बिचारा। नहिं निसिचर कुल केर उबारा॥ १॥

हनुमान लंका जाळून गेला, तेव्हापासून तेथे राक्षस भयभीत होऊन राहू लागले.

ते आपल्या घरी विचार करीत बसले की आता राक्षस-कुलाचे रक्षण (संरक्षणाचा उपाय) नाही. ॥ १ ॥

जासु दूत बल बरनि न जाई । तेहि आएँ पुर कवन भलाई ॥
दूतिन्ह सन सुनि पुरजन बानी । मंदोदरी अधिक अकुलानी ॥ २ ॥

ज्याच्या दूताच्या बळाचे वर्णन करणे शक्य नाही, तो स्वत:च नगरात आल्यावर मग कसचे भले होणार? (आमची फार वाईट दशा होईल.) दूतींच्या कडून नगरवासियांचे हे बोलणे ऐकून मंदोदरी व्याकूळ झाली. ॥ २ ॥

रहसि जोरि कर पति पग लागी । बोली बचन नीति रस पागी ॥
कंत करष हरि सन परिहरहू । मोर कहा अति हित हियँ धरहू ॥ ३ ॥

ती हात जोडून व पतीच्या चरणी लागून नीति-रसाने परिपूर्ण अशा वाणीने म्हणाली, 'हे प्रिय, श्रीहरीशी विरोध सोडून द्या. माझे म्हणणे लक्षात घ्या. ॥ ३ ॥

समुझत जासु दूत कइ करनी । स्रवहिं गर्भ रजनीचर घरनी ॥
तासु नारि निज सचिव बोलाई । पठवहु कंत जो चहहु भलाई ॥ ४ ॥

ज्याच्या दूताच्या प्रतापाची आठवण होताच राक्षस स्त्रियांचे गर्भ गळून पडतात, म्हणून जर तुम्हाला आपले भले व्हावे असे वाटत असेल, तर आपल्या मंत्र्याला बोलावून त्या रामाच्या पत्नीला परत पाठवून द्या. ॥ ४ ॥

तव कुल कमल बिपिन दुखदाई । सीता सीत निसा सम आई ॥
सुनहु नाथ सीता बिनु दीन्हें । हित न तुम्हार संभु अज कीन्हें ॥ ५ ॥

तुमच्या कुलाच्या कमल-वनाला दु:ख देणारी थंडीतील रात्र बनून सीता आली आहे. हे नाथा, माझे ऐका. सीतेला परत केल्याविना भगवान शंकर व ब्रह्मदेव हेसुद्धा तुमचे भले करू शकणार नाहीत. ॥ ५ ॥

दो०– राम बान अहि गन सरिस निकर निसाचर भेक ।
जब लगि ग्रसत न तब लगि जतनु करहु तजि टेक ॥ ३६ ॥

श्रीरामाचे बाण हे सर्पांच्या समूहांसारखे आहेत आणि राक्षसांचे समूह हे बेडकांप्रमाणे आहेत. जोपर्यंत ते बाण ग्रासत नाहीत, तोपर्यंत आपला हट्ट सोडून काही उपाय करा.' ॥ ३६ ॥

श्रवन सुनी सठ ता करि बानी। बिहसा जगत बिदित अभिमानी॥
सभय सुभाउ नारि कर साचा। मंगल महुँ भय मन अति काचा॥ १॥

मंदोदरीचे शब्द ऐकून तो मूर्ख व जगप्रसिद्ध घमेंडखोर रावण खदखदून हसला आणि म्हणाला की, 'स्त्रियांचा स्वभाव हा फार घाबरट असतो. मंगल प्रसंगीसुद्धा घाबरतेस? तुझे मन फारच कच्चे आहे. ॥ १॥

जौं आवइ मर्कट कटकाई। जिअहिं बिचारे निसिचर खाई॥
कंपहिं लोकप जाकीं त्रासा। तासु नारि सभीत बड़ि हासा॥ २॥

जर वानरांच्या सेना आल्या तर आपले बिचारे राक्षस त्यांना खाऊन टाकून पोटे भरतील. ज्याच्यामुळे लोकपालसुद्धा घाबरून कापू लागतात, त्याची पत्नी असून तू घाबरतेस, ही हास्यास्पद गोष्ट आहे.' ॥ २॥

अस कहि बिहसि ताहि उर लाई। चलेउ सभाँ ममता अधिकाई॥
मंदोदरी हृदयँ कर चिंता। भयउ कंत पर बिधि बिपरीता॥ ३॥

असे म्हणून रावणाने तिला हृदयाशी धरले आणि तो अधिक ममता दाखवून सभेकडे निघून गेला. मंदोदरी मनात काळजी करू लागली की विधाता पतीशी प्रतिकूल झाला आहे. ॥ ३॥

बैठेउ सभाँ खबरि असि पाई। सिंधु पार सेना सब आई॥
बूझेसि सचिव उचित मत कहहू। ते सब हँसे मष्ट करि रहहू॥ ४॥

तो रावण सभेत जाऊन बसताच वार्ता आली की, शत्रूची सर्व सेना समुद्राच्या पलीकडे आली आहे. तेव्हा त्याने मंत्र्यांना विचारले की 'योग्य सल्ला द्या.' आता काय करावे. तेव्हा ते हसून म्हणाले, 'गप्प राहावे.' यात काय सल्ला द्यायचा? ॥४॥

जितेहु सुरासुर तब श्रम नाहीं। नर बानर केहि लेखे माहीं॥ ५॥

'तुम्ही देवांना व राक्षसांना जिंकून घेतले, तेव्हा काही त्रास झाला नाही. मग मनुष्य व वानर यांची काय गणना?' ॥ ५॥

दो०– सचिव बैद गुर तीनि जौं प्रिय बोलहिं भय आस।
राज धर्म तन तीनि कर होइ बेगिहीं नास॥ ३७॥

जर मंत्री, वैद्य व गुरू हे तिघे भयामुळे किंवा (स्वार्थाच्या) आशेने गोड बोलू लागले, (हिताची गोष्ट सांगत नाहीत) तर राज्य, धर्म व शरीर या तिन्हींचा त्वरित नाश होतो. ॥ ३७॥

सोइ रावन कहुँ बनी सहाई। अस्तुति करहिं सुनाइ सुनाई॥
अवसर जानि बिभीषनु आवा। भ्राता चरन सीसु तेहिं नावा॥ १॥

रावणावरसुद्धा असाच प्रसंग आला. मंत्री त्याची सारखी स्तुती करीत होते. प्रसंग पाहून बिभीषण पुढे आला. त्याने थोरल्या भावाच्या चरणी मस्तक ठेवले. ॥ १॥

पुनि सिरु नाइ बैठ निज आसन। बोला बचन पाइ अनुसासन॥
जौ कृपाल पूँछिहु मोहि बाता। मति अनुरूप कहउँ हित ताता॥ २॥

नतमस्तक होऊन मग तो आपल्या आसनावर जाऊन बसला आणि आज्ञा घेऊन म्हणाला, "हे कृपाळू, तू माझा अभिप्राय विचारलेच आहेस, तर हे तात, मी आपल्या बुद्धीप्रमाणे तुझ्या हिताची गोष्ट सांगतो. ॥ २॥

जो आपन चाहै कल्याना। सुजसु सुमति सुभ गति सुख नाना॥
सो परनारि लिलार गोसाईं। तजउ चउथि के चंद कि नाईं॥ ३॥

जो मनुष्य आपले कल्याण, सुंदर कीर्ती, सुबुद्धी, शुभगती आणि नानाप्रकारचे सुख यांची इच्छा करतो, त्याने हे स्वामी! परस्त्रीच्या मुखास चतुर्थीच्या चंद्रम्या प्रमाणे त्यागावे. (अर्थात लोक चतुर्थीचा चंद्र ज्याप्रमाणे पाहत नाहीत त्या प्रमाणे परस्त्रीचे मुख देखील पाहता कामा नये.)॥ ३॥

चौदह भुवन एक पति होई। भूतद्रोह तिष्ठइ नहिं सोई॥
गुन सागर नागर नर जोऊ। अलप लोभ भल कहइ न कोऊ॥ ४॥

चौदा भुवनांचा एक स्वामी असला, तरी तो जिवांशी वैर केल्यावर राहू शकत नाही. (नष्ट होतो) एखादा मनुष्य गुणांचा सागर असला आणि चतुर असला, परंतु त्याला थोडासासुद्धा लोभ असेल तर त्याला कोणी चांगला म्हणत नाही. ॥ ४॥

दो०- काम क्रोध मद लोभ सब नाथ नरक के पंथ।
सब परिहरि रघुबीरहि भजहु भजहिं जेहि संत॥ ३८॥

हे नाथा, काम, क्रोध, मद व लोभ– हे सर्व नरकाचे मार्ग आहेत. या सर्वांचा त्याग करून संत-सत्पुरुष ज्या श्रीरामाला भजतात, त्या रामाचे भजन कर. ॥ ३८॥

तात राम नहिं नर भूपाला। भुवनेस्वर कालहु कर काला॥
ब्रह्म अनामय अज भगवंता। ब्यापक अजित अनादि अनंता॥ १॥

हे तात, राम हा काही मनुष्यांचा राजा नव्हे. तो सर्व लोकांचा स्वामी व काळाचाही काळ आहे. तो (संपूर्ण ऐश्वर्य, यश, श्री, धर्म, वैराग्य व ज्ञानाचे भांडार आहे) भगवान आहे. तो निरामय, अजन्मा, व्यापक, अजेय, अनादी व अनंत ब्रह्म आहे. ॥ १॥

गो द्विज धेनु देव हितकारी। कृपासिंधु मानुष तनुधारी ॥
जन रंजन भंजन खल ब्राता। बेद धर्म रच्छक सुनु भ्राता ॥ २ ॥

त्या कृपा-सिंधू भगवंताने पृथ्वी, ब्राह्मण, गौ व देव यांच्या हितासाठी मानव शरीर धारण केले आहे. हे बंधू, तो भक्तांना आनंद देणारा, दुष्टांच्या समूहांचा नाश करणारा व वेद आणि धर्म यांचे रक्षण करणारा आहे. ॥ २ ॥

ताहि बयरु तजि नाइअ माथा। प्रनतारति भंजन रघुनाथा ॥
देहु नाथ प्रभु कहुँ बैदेही। भजहु राम बिनु हेतु सनेही ॥ ३ ॥

वैर सोडून त्याच्यापुढे नतमस्तक हो. तो रघुनाथ शरणागताचे दुःख नाहीसे करणारा आहे. हे नाथ, त्या प्रभूला जानकी परत कर व विनाकारण (स्वाभाविक) प्रेम करणाऱ्या त्या रघुनाथाचे भजन कर. ॥ ३ ॥

सरन गएँ प्रभु ताहु न त्यागा। बिस्व द्रोह कृत अघ जेहि लागा ॥
जासु नाम त्रय ताप नसावन। सोइ प्रभु प्रगट समुझु जियँ रावन ॥ ४ ॥

ज्याला विश्वाचा द्रोह केल्याचे पाप लागले आहे, तो शरण आला तर प्रभू त्याचाही त्याग करीत नाही. ज्याचे नाम त्रितापांचा नाश करणारे आहे, तोच प्रभू मनुष्यरूपाने प्रकट झाला आहे. हे रावणा, मनात हे जाणून घे. ॥ ४ ॥

दो०– बार बार पद लागउँ बिनय करउँ दससीस ।
परिहरि मान मोह मद भजहु कोसलाधीस ॥ ३९ ॥ (क)

हे दशानना, वारंवार तुझ्या पाया पडतो व विनंती करतो की, मान, मोह व अहंकार यांचा त्याग करून कोसलपती श्रीरामाचे भजन कर. ॥ ३९ ॥(क)

मुनि पुलस्ति निज सिष्य सन कहि पठई यह बात।
तुरत सो मैं प्रभु सन कही पाइ सुअवसरु तात ॥ ३९ ॥ (ख)

मुनी पुलस्तीने आपल्या शिष्याबरोबर हा निरोप पाठविला आहे. हे तात, योग्य संधी पाहून मी ही गोष्ट तुला सांगत आहे.' ॥ ३९ ॥ (ख)

माल्यवंत अति सचिव सयाना। तासु बचन सुनि अति सुख माना ॥
तात अनुज तव नीति बिभूषन। सो उर धरहु जो कहत बिभीषन ॥ १ ॥

माल्यवंत हा एक फार शहाणा मंत्री होता. बिभीषणाचे शब्द ऐकून त्याला समाधान वाटले. तो म्हणाला, 'हे तात, तुमचा लहान भाऊ बिभीषण हा नीति-विभूषण (नीतिमान) आहे. तो जे सांगत आहे, ते मनात बाळगा.' (लक्षात घ्या.) ॥ १ ॥

रिपु उतकरष कहत सठ दोऊ। दूरि न करहु इहाँ हइ कोऊ ॥
माल्यवंत गृह गयउ बहोरी। कहइ बिभीषन पुनि कर जोरी ॥ २ ॥

(रावण म्हणाला) 'हे दोघे मूर्ख शत्रूची महिमा सांगत आहेत. येथे कोणी आहे का? या दोघांना येथून दूर का करीत नाही?' मग माल्यवान घरी निघून गेला आणि बिभीषण पुन्हा हात जोडून म्हणू लागला, ॥ २ ॥

सुमति कुमति सब कें उर रहहीं । नाथ पुरान निगम अस कहहीं ॥
जहाँ सुमति तहँ संपति नाना । जहाँ कुमति तहँ बिपति निदाना ॥ ३ ॥

'हे नाथ, वेद आणि पुराणे असे म्हणतात की सर्वांच्या हृदयात सुबुद्धी आणि कुबुद्धी असते. जेथे सुबुद्धी असते तेथे नाना प्रकारच्या संपदा (सुखाच्या स्थिती) असतात आणि जिथे कुबुद्धी असते, तेथे नाना विपत्ती (दुःखे) असतात. ॥३ ॥

तव उर कुमति बसी बिपरीता । हित अनहित मानहु रिपु प्रीता ॥
कालरात्रि निसिचर कुल केरी । तेहि सीता पर प्रीति घनेरी ॥ ४ ॥

तुझ्या मनात विपरीत बुद्धी वसलेली आहे. त्यामुळे तू जे हित आहे त्याला अहित व शत्रूला मित्र मानत आहेस. राक्षस कुलाला जी कालरात्रीप्रमाणे आहे, त्या सीतेवर तुझे प्रेम आहे. ॥ ४ ॥

दो०– तात चरन गहि मागउँ राखहु मोर दुलार ।
सीता देहु राम कहुँ अहित न होइ तुम्हार ॥ ४० ॥

हे तात, मी तुझे पाय धरून भीक मागतो, माझे लाड पुरव. माझे म्हणणे प्रेमाने मान्य कर. रामाला सीता परत दे. त्यामुळे तुझे अहित होणार नाही.' ॥ ४० ॥

बुध पुरान श्रुति संमत बानी । कही बिभीषन नीति बखानी ॥
सुनत दसानन उठा रिसाई । खल तोहि निकट मृत्यु अब आई ॥ १ ॥

पंडितांना, पुराणांना व वेदांना मान्य असलेल्या वाणीने बिभीषणाने नीतीचे वर्णन केले. ते ऐकून रावण रागावला व म्हणाला, 'अरे दुष्ट, तुझे मरण आता जवळ आले आहे. ॥ १ ॥

जिअसि सदा सठ मोर जिआवा । रिपु कर पच्छ मूढ तोहि भावा ॥
कहसि न खल अस को जग माहीं । भुज बल जाहि जिता मैं नाहीं ॥ २ ॥

अरे मूर्खा, मी जगविल्यामुळे तू जगला आहेस. (माझ्या अन्नावर) परंतु मूर्खा, तुला शत्रूचा पक्ष आवडतो. अरे दुष्ट, मी आपल्या बाहुबलाने जिंकला नाही, असा जगात कोण आहे ते सांग. ॥ २ ॥

मम पुर बसि तपसिन्ह पर प्रीती । सठ मिलु जाइ तिन्हहि कहु नीती ॥
अस कहि कीन्हेसि चरन प्रहारा । अनुज गहे पद बारहिं बारा ॥ ३ ॥

माझ्या नगरात राहून त्या तपस्व्यांवर प्रेम करतोस? मूर्खा, त्यांना जाऊन भेट आणि त्यांनाच नीतीचा उपदेश कर.' असे म्हणून त्याने बिभीषणाला लाथ मारली. तरीही त्या लहान बंधू बिभीषणाने त्याचे वारंवार पाय धरले. ॥३॥

उमा संत कइ इहइ बड़ाई। मंद करत जो करइ भलाई॥
तुम्ह पितु सरिस भलेहिं मोहि मारा। रामु भजें हित नाथ तुम्हारा॥ ४॥

(शंकर म्हणतात,) 'उमे, संतांचे मोठेपण हेच आहे की, वाईट केले तरी (वाईट करणाऱ्याचे) ते भले करतात.' बिभीषण (रावणाला म्हणाला,) 'तू मला मारलेस तरीही तू मला वडीलांसारखा आहेस. परंतु हे स्वामी, श्रीरामाला भजण्यातच तुझे भले आहे.' ॥४॥

सचिव संग लै नभ पथ गयऊ। सबहि सुनाइ कहत अस भयऊ॥५॥

(असे म्हणून) बिभीषण आपल्या मंत्र्यांसह आकाशमार्गाने गेला व जाताना सर्वांना उद्देशून म्हणू लागला, ॥५॥

दो०– रामु सत्यसंकल्प प्रभु सभा कालबस तोरि।
मैं रघुबीर सरन अब जाउँ देहु जनि खोरि॥ ४१॥

'श्रीराम हा सत्यसंकल्प व सर्वसमर्थ प्रभू आहे. तुझी सभा कालाला वश झाली आहे. मी आता श्रीरामाला शरण जातो, मला दोष देऊ नकोस.' ॥४१॥

अस कहि चला बिभीषनु जबहीं। आयूहीन भए सब तबहीं॥
साधु अवग्या तुरत भवानी। कर कल्यान अखिल कै हानी॥ १॥

असे म्हणून बिभीषण जेव्हा निघाला, तेव्हा सर्वजण आयुष्यहीन झाले. (त्यांचे मरण निश्चित झाले.) (शंकर म्हणाला) 'हे भवानी, साधूचा अपमान हा संपूर्ण कल्याणाचा नाश करतो. ॥१॥

रावन जबहिं बिभीषन त्यागा। भयउ बिभव बिनु तबहिं अभागा॥
चलेउ हरषि रघुनायक पाहीं। करत मनोरथ बहु मन माहीं॥ २॥

रावणाने ज्या क्षणी बिभीषणाचा त्याग केला, त्या क्षणी तो दुर्दैवी वैभवहीन झाला. बिभीषण हा मोठ्या आनंदाने व मनात अनेक मनोरथ करीत श्रीरामाकडे निघाला. ॥२॥

देखिहउँ जाइ चरन जलजाता। अरुन मृदुल सेवक सुखदाता॥
जे पद परसि तरी रिषिनारी। दंडक कानन पावनकारी॥ ३॥

(तो मनोरथ करीत होता की) मी जाऊन भगवंताच्या कोमल व लाल वर्णाच्या

सुंदर चरण-कमलांचे दर्शन घेईन. ते चरण सेवकांना सुख देणारे आहेत. ज्या चरणांच्या स्पर्शामुळे ऋषिपत्नी (अहल्या) ही तरून गेली व ते चरण दंडकवनाला पवित्र करणारे आहेत. ॥ ३ ॥

जे पद जनकसुताँ उर लाए। कपट कुरंग संग धर धाए॥
हर उर सर सरोज पद जेई। अहोभाग्य मैं देखिहउँ तेई॥ ४॥

ज्या चरणांना जनक-सुताने आपल्या हृदयात धारण केलेले आहे, जे चरण माया-मृगामागे धरणीवर धावत गेले होते, जे चरण प्रत्यक्ष शिवशंकराच्या हृदयरूपी सरोवरात विराजमान आहेत, आज मी त्या चरणांचे दर्शन घेईन, हे माझे मोठे भाग्य होय. ॥ ४॥

दो०– जिन्ह पायन्ह के पादुकन्हि भरतु रहे मन लाइ।
ते पद आजु बिलोकिहउँ इन्ह नयनन्हि अब जाइ॥ ४२॥

ज्या चरणांतील पादुका भरताने आपल्या मनात वसविल्या आहेत, आज मी जाऊन ते चरण स्वत:च्या नेत्रांनी पाहीन. ॥ ४२ ॥

एहि बिधि करत सप्रेम बिचारा। आवउ सपदि सिंधु एहिं पारा॥
कपिन्ह बिभीषनु आवत देखा। जाना कोउ रिपु दूत बिसेषा॥ १॥

अशा प्रकारे मोठ्या प्रेमाने विचार करीत तो समुद्राच्या पलीकडे आला. वानरांनी जेव्हा बिभीषणाला येताना पाहिले, तेव्हा त्यांना वाटले की हा शत्रूचा कोणीतरी विशेष दूत असावा. ॥ १ ॥

ताहि राखि कपीस पहिं आए। समाचार सब ताहि सुनाए॥
कह सुग्रीव सुनहु रघुराई। आवा मिलन दसानन भाई॥ २॥

त्याला (पहाऱ्याच्या ठिकाणी) थांबवून ते वानर सुग्रीवाजवळ आले आणि त्यांनी सर्व वार्ता सांगितली. सुग्रीवाने श्रीरामाला सांगितले की, 'रावणाचा भाऊ भेटण्यास आला आहे.' ॥ २ ॥

कह प्रभु सखा बूझिऐ काहा। कहइ कपीस सुनहु नरनाहा॥
जानि न जाइ निसाचर माया। कामरूप केहि कारन आया॥ ३॥

प्रभू श्रीरामाने विचारले की, 'तुला काय वाटते?' वानरराज सुग्रीव म्हणाला की, 'हे महाराज, ऐक. राक्षसांची माया जाणता येत नाही. हा इच्छेप्रमाणे रूप बदलणारा (कपटी) का आला आहे, कोणास ठाऊक. ॥३॥

भेद हमार लेन सठ आवा। राखिअ बाँधि मोहि अस भावा॥
सखा नीति तुम्ह नीकि बिचारी। मम पन सरनागत भयहारी॥ ४॥

(असे वाटते की) हा मूर्ख आपले रहस्य जाणून घेण्यास आला आहे. याला बांधून ठेवावे, असे मला वाटते.' तेव्हा श्रीराम म्हणाला, 'मित्रा, तू चांगली नीती शोधून काढलीस. परंतु शरणागताचे भय हरण करणे, हा माझा प्रण आहे.' ॥ ४॥

सुनि प्रभु बचन हरष हनुमाना। सरनागत बच्छल भगवाना॥ ५॥

श्रीराम प्रभूचे बोलणे ऐकून हनुमंताला आनंद झाला. (तो मनात म्हणाला की) 'भगवंत किती शरणागत-वत्सल आहे.' ॥ ५॥

दो०– सरनागत कहुँ जे तजहिं निज अनहित अनुमानि।
ते नर पावँर पापमय तिन्हहि बिलोकत हानि॥ ४३॥

(श्रीराम म्हणाला) 'जो मनुष्य आपले अहित होईल, असे अनुमान करून शरण आलेल्याचा त्याग करतो, तो पामर (क्षुद्र) होय, पापमय होय. अशा माणसाला पाहणे हेसुद्धा हानिकारक (पापकारक) होय. ॥ ४३॥

कोटि बिप्र बध लागहिं जाहू। आएँ सरन तजउँ नहिं ताहू॥
सनमुख होइ जीव मोहि जबहीं। जन्म कोटि अघ नासहिं तबहीं॥ १॥

कोटिवधी ब्राह्मण-वधाचे पाप ज्याला लागले असेल, असा मनुष्य मला शरण आला तरी मी त्याचा त्याग करीत नाही. (कोणीही) जीव माझ्यासमोर आला की, त्याच्या कोटिवधी जन्मांचे पाप नष्ट होते. ॥ १॥

पापवंत कर सहज सुभाऊ। भजनु मोर तेहि भाव न काऊ॥
जौं पै दुष्ट हृदय सोइ होई। मोरें सनमुख आव कि सोई॥ २॥

पापी माणसाला माझे भजन आवडत नाही, हा त्याचा सहज स्वभाव असतो. जर तो (रावणाचा भाऊ बिभीषण) खरोखरच दुष्ट हृदय असता, तर तो माझ्यासमोर आला असता काय? ॥ २॥

निर्मल मन जन सो मोहि पावा। मोहि कपट छल छिद्र न भावा॥
भेद लेन पठवा दससीसा। तबहुँ न कछु भय हानि कपीसा॥ ३॥

जो निर्मल मनाचा मनुष्य असतो, त्यालाच मी प्राप्त होतो. मला कपट, छल आणि छिद्र आवडत नाही. जर रावणाने आपले रहस्य शोधण्यासाठी याला पाठविले असेल तर हे सुग्रीवा, आपल्याला काही भीती किंवा हानी नाही. ॥ ३॥

जग महुँ सखा निसाचर जेते। लछिमनु हनइ निमिष महुँ तेते॥
जौं सभीत आवा सरनाईं। रखिहउँ ताहि प्रान की नाईं॥ ४॥

हे मित्रा, जगात जे राक्षस आहेत, त्या सर्वांना लक्ष्मण एका क्षणात मारून टाकू शकतो. तो (बिभीषण) जर भयभीत होऊन मला शरण आला असेल तर मी त्याचे प्राणाप्रमाणे रक्षण करीन. ॥ ४॥

दो०– उभय भाँति तेहि आनहु हँसि कह कृपानिकेत।
जय कृपाल कहि कपि चले अंगद हनू समेत॥ ४४॥

दोन्हीही स्थितींमध्ये (काहीही झाले तरी) त्याला घेऊन ये.' असे कृपानिधी श्रीराम म्हणाला. सुग्रीव हनुमंतासह 'कृपाळू रामाचा विजय असो,' असे म्हणत निघाला.॥४४॥

सादर तेहि आगें करि बानर। चले जहाँ रघुपति करुनाकर॥
दूरिहि ते देखे द्वौ भ्राता। नयनानंद दान के दाता॥ १॥

जेथे करुणाकर श्रीराम होता, तेथे (बिभीषणाला) मोठ्या आदराने पुढे घालून वानर घेऊन आले. नेत्रांना आनंद प्रदान करणाऱ्या त्या दोघा भावांना बिभीषणाने दुरून पाहिले. ॥ १॥

बहुरि राम छबिधाम बिलोकी। रहेउ ठटुकि एकटक पल रोकी॥
भुज प्रलंब कंजारुन लोचन। स्यामल गात प्रनत भय मोचन॥ २॥

नंतर शोभा-धाम असलेल्या श्रीरामाला पाहून तो निर्निमेष नेत्रांनी स्तब्ध होऊन एकटक बघतच राहिला. श्रीरामाच्या विशाल भुजा होत्या, त्याचे नेत्र लाल कमळांप्रमाणे आणि शरणागताची भीती दूर करणारे त्याचे सावळे शरीर होते. ॥२॥

सिंघ कंध आयत उर सोहा। आनन अमित मदन मन मोहा॥
नयन नीर पुलकित अति गाता। मन धरि धीर कही मृदु बाता॥ ३॥

त्याचे खांदे सिंह-स्कंधाप्रमाणे होते. विशाल वक्षःस्थळ अत्यंत शोभत होते. असंख्य कामदेवांना मोहित करून टाकणारे त्याचे (सुंदर) मुख होते. श्रीरामाचे ते रूप पाहून बिभीषणाचे नेत्र प्रेमाश्रूंनी भरून आले व शरीर पुलकित झाले. मग मोठ्या धीराने कोमल शब्दांत तो म्हणू लागला. ॥ ३॥

नाथ दसानन कर मैं भ्राता। निसिचर बंस जनम सुरत्राता॥
सहज पापप्रिय तामस देहा। जथा उलूकहि तम पर नेहा॥ ४॥

'हे स्वामी, मी दशानन रावणाचा भाऊ आहे. हे देवांच्या रक्षका, माझा जन्म

राक्षस-कुलात झालेला आहे. माझे शरीर तामसी असून ज्या प्रमाणे घुबडाला अंधार आवडतो त्या प्रमाणे स्वभावत: मला पाप आवडते. ॥ ४ ॥

दो०– श्रवन सुजसु सुनि आयउँ प्रभु भंजन भव भीर।
त्राहि त्राहि आरति हरन सरन सुखद रघुबीर॥ ४५॥

हे प्रभू, तू भवभय (जन्ममरण) हरण करणारा आहेस, अशी तुझी कीर्ती ऐकून मी आलो आहे. दु:खी जनांचे दु:ख दूर करणाऱ्या व शरणागताला सुख देणाऱ्या श्रीरामा, माझे रक्षण कर, माझे रक्षण कर.' ॥ ४५ ॥

अस कहि करत दंडवत देखा। तुरत उठे प्रभु हरष बिसेषा॥
दीन बचन सुनि प्रभु मन भावा। भुज बिसाल गहि हृदयँ लगावा॥ १॥

असे म्हणत त्याने दंडवत घातला, श्रीराम आनंदाने त्वरित उठला. बिभीषणाचे ते दीन वचन श्रीरामाला आवडले. त्याने आपल्या विशाल हातांनी त्याला आलिंगन दिले. ॥ १ ॥

अनुज सहित मिलि ढिग बैठारी। बोले बचन भगत भयहारी॥
कहु लंकेस सहित परिवारा। कुसल कुठाहर बास तुम्हारा॥ २॥

आपला छोटा भाऊ लक्ष्मणासमवेत श्रीरामाने बिभीषणाला आपल्या जवळ बसविले. भक्तांचे भय दूर करणारा श्रीराम म्हणाला, 'हे लंकेशा, तुझी आणि तुझ्या कुटुंबाची खुशाली सांग. तुझा निवास वाईट जागी आहे. ॥ २ ॥

खल मंडली बसहु दिनु राती। सखा धरम निबहइ केहि भाँती॥
मैं जानउँ तुम्हारि सब रीती। अति नय निपुन न भाव अनीती॥ ३॥

रात्रंदिवस दुष्टांच्या मंडळीत राहतोस, मग हे मित्रा, तुला आपला धर्म कसा सांभाळता येईल? मला तुझी संपूर्ण रीत (आचार-व्यवहार) माहीत आहे. तू फार नीति-निपुण आहेस. तुला अनीती आवडत नाही. ॥ ३ ॥

बरु भल बास नरक कर ताता। दुष्ट संग जनि देइ बिधाता॥
अब पद देखि कुसल रघुराया। जौं तुम्ह कीन्हि जानि जन दाया॥ ४॥

हे तात, नरकात राहणे फार चांगले, परंतु विधात्याने दुष्टांची कधी संगत देऊ नये.' (मग बिभीषण म्हणाला) 'हे रघुवीरा, तुझ्या चरणांचे दर्शन झाल्यामुळे मी सुखरूप आहे. तू आपला सेवक समजून माझ्यावर दया दाखविलीस. ॥ ४ ॥

दो०– तब लगि कुसल न जीव कहुँ सपनेहुँ मन बिश्राम।
जब लगि भजत न राम कहुँ सोक धाम तजि काम॥ ४६॥

जोपर्यंत जीव हा शोकाचे घर असलेला काम (विषय कामना) सोडून श्रीरामाला भजत नाही, तोपर्यंत तो सुखरूप नाही व त्याला स्वप्नातही शांतता नसते. ॥ ४६॥

तब लगि हृदयँ बसत खल नाना। लोभ मोह मच्छर मद माना॥
जब लगि उर न बसत रघुनाथा। धरें चाप सायक कटि भाथा॥ १॥

जोपर्यंत लोभ, मोह, मत्सर, मद व मान इत्यादी अनेक दुष्ट भाव मनामध्ये वसतात, तोपर्यंत धनुर्बाण धारी श्री रघुनाथ हा मनात वसत नाही. ॥ १॥

ममता तरुन तमी अँधिआरी। राग द्वेष उलूक सुखकारी॥
तब लगि बसति जीव मन माहीं। जब लगि प्रभु प्रताप रबि नाहीं॥ २॥

ममता ही पूर्ण अंधारी रात्र आहे. ती राग-द्वेषरूपी घुबडांना सुख देणारी आहे. जोपर्यंत प्रभूचा प्रतापरूपी सूर्य उदय पावत नाही, तोपर्यंत ती (ममतारूपी रात्र) जीवाच्या मनात वसते ॥ २॥

अब मैं कुसल मिटे भय भारे। देखि राम पद कमल तुम्हारे॥
तुम्ह कृपाल जा पर अनुकूला। ताहि न ब्याप त्रिबिध भव सूला॥ ३॥

हे रामा, तुझ्या चरणांच्या दर्शनाने माझ्या भयाचा भार नष्ट झाला व मी आता सुखरूप आहे. हे कृपाळू, तू ज्याला अनुकूल होतोस, त्याला तीन प्रकारचे भव-शूल (आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक ताप) ग्रासत नाहीत. ॥ ३॥

मैं निसिचर अति अधम सुभाऊ। सुभ आचरनु कीन्ह नहिं काऊ॥
जासु रूप मुनि ध्यान न आवा। तेहिं प्रभु हरषि हृदयँ मोहि लावा॥ ४॥

मी अत्यंत नीच स्वभावाचा राक्षस आहे. मी कधी शुभ आचरण केलेले नाही. ज्याचे रूप मुनींच्या ध्यानातही येत नाही, त्या प्रभूने मला हृदयाशी कवटाळले. ॥ ४॥

दो०– अहोभाग्य मम अमित अति राम कृपा सुख पुंज।
देखेउँ नयन बिरंचि सिव सेब्य जुगल पद कंज॥ ४७॥

हे कृपेची व सुखाची राशी असलेल्या रामा, हे माझे मोठे सद्भाग्य होय की, ब्रह्मदेव व शंकर यांचेकडून ज्या युगल चरणांची सेवा होते, ते (तुझे) चरण मी आपल्या नेत्रांनी पाहिले.' ॥ ४७॥

सुनहु सखा निज कहउँ सुभाऊ। जान भुसुंडि संभु गिरिजाऊ॥
जौं नर होइ चराचर द्रोही। आवै सभय सरन तकि मोही॥ १॥

(श्रीराम म्हणाला,) "हे मित्रा, ऐक. मी तुला माझा स्वभाव सांगतो. काकभुशुंडी, शंकर व पार्वती हे तो (माझा स्वभाव) जाणतात. जरी एखादा मनुष्य संपूर्ण जड-चेतन जगाचा द्रोही असला आणि भयभीत होऊन मला शरण आला. ॥१॥

तजि मद मोह कपट छल नाना। करउँ सद्य तेहि साधु समाना॥
जननी जनक बंधु सुत दारा। तनु धनु भवन सुहृद परिवारा॥ २॥

तसेच त्याने अहंकार, मोह व नाना तऱ्हेचे कपट सोडून दिले, तर मी त्याला त्वरित साधूसारखा बनवितो. माता-पिता, बंधू, पुत्र, पत्नी, शरीर, धन, घर, मित्र व परिवार –॥२॥

सब कै ममता ताग बटोरी। मम पद मनहि बाँध बरि डोरी॥
समदरसी इच्छा कछु नाहीं। हरष सोक भय नहिं मन माहीं॥ ३॥

या सर्वांविषयींचे ममत्वाचे बंध एकत्र करून व त्यांची दोरी वळून जो त्या दोरीने आपल्या मनाला माझ्या चरणांना बांधून टाकतो (सर्व सांसारिक संबंधांचा केंद्र-बिंदू मला बनवितो), जो समदर्शी आणि ज्याला काहीही इच्छा नाही आणि ज्याच्या मनात हर्ष, शोक व भय नाही, ॥३॥

अस सज्जन मम उर बस कैसें। लोभी हृदयँ बसइ धनु जैसें॥
तुम्ह सारिखे संत प्रिय मोरें। धरउँ देह नहिं आन निहोरें॥ ४॥

असा सज्जन हा माझ्या मनात अशा प्रकारे वसतो की ज्या प्रकारे लोभी माणसाच्या मनात धन वसते. तुझ्यासारखा संतच मला प्रिय आहे. सज्जनांचा रक्षणा साठीच माझा अवतार आहे ॥४॥

दो०– सगुन उपासक परहित निरत नीति दृढ़ नेम।
ते नर प्रान समान मम जिन्ह कें द्विज पद प्रेम॥ ४८॥

जे सगुण (साकार) भगवंताचे उपासक आहेत, जे परहित करण्यात मग्न आहेत, जे नीती व नियमांनी दृढ आहेत आणि ज्यांना ब्राह्मणांच्या चरणी प्रेम आहे, अशी माणसे मला प्राणांसारखी प्रिय असतात. ॥४८॥

सुनु लंकेस सकल गुन तोरें। तातें तुम्ह अतिसय प्रिय मोरें॥
राम बचन सुनि बानर जूथा। सकल कहहिं जय कृपा बरूथा॥ १॥

हे लंकापती विभीषणा, ऐक. तुझ्यामध्ये हे सर्व गुण आहेत, म्हणून तू मला

अतिशय प्रिय आहेस.' श्रीरामाचे हे वचन ऐकून वानरांचे सर्व समुदाय म्हणू लागले की, 'कृपा-निधी श्रीरामाचा विजय असो.' ॥ १ ॥

सुनत बिभीषनु प्रभु कै बानी। नहिं अघात श्रवनामृत जानी॥
पद अंबुज गहि बारहिं बारा। हृदयँ समात न प्रेमु अपारा॥ २॥

रामप्रभूची वाणी ऐकून ते श्रवणामृत वाटल्यामुळे बिभीषणाला तृप्ती होत नव्हती. तो वारंवार श्रीरामाचे चरण-कमल धरीत होता. त्याचे अपार प्रेम हृदयात मावत नव्हते. ॥ २ ॥

सुनहु देव सचराचर स्वामी। प्रनतपाल उर अंतरजामी॥
उर कछु प्रथम बासना रही। प्रभु पद प्रीति सरित सो बही॥ ३॥

(तो म्हणाला,) 'हे देवा, हे चराचर सृष्टीच्या स्वामी, हे शरणागत-रक्षक, हे सर्वांचे हृदय जाणणाऱ्या अंतर्यामी, प्रथमतः माझ्या मनात काहीशी वासना होती, परंतु प्रभु-चरणांच्या प्रेमाच्या नदीमध्ये ती वाहून गेली. ॥ ३ ॥

अब कृपाल निज भगति पावनी। देहु सदा सिव मन भावनी॥
एवमस्तु कहि प्रभु रनधीरा। मागा तुरत सिंधु कर नीरा॥ ४॥

हे कृपाळू श्रीरामा, शिवशंकराला नित्य प्रिय वाटणारी आपली भक्ती आता तू मला दे.' 'एवमस्तु' (असेच होवो.) असे म्हणून रणधीर श्रीरामाने समुद्र-जल मागविले. ॥ ४ ॥

जदपि सखा तव इच्छा नाहीं। मोर दरसु अमोघ जग माहीं॥
अस कहि राम तिलक तेहि सारा। सुमन बृष्टि नभ भई अपारा॥ ५॥

(श्रीराम म्हणाला,) 'हे मित्रा, जरी तुझी इच्छा नसली , तरी माझे दर्शन हे अमोघ आहे ' (निष्फळ होत नाही.) असे म्हणून श्रीरामाने त्याला राजतिलक केला. त्या वेळी आकाशातून अपार पुष्पवृष्टी झाली. ॥ ५ ॥

दो०– रावन क्रोध अनल निज स्वास समीर प्रचंड।
जरत बिभीषनु राखेउ दीन्हेउ राजु अखंड॥ ४९॥(क)

रावणाचा क्रोधाग्नी बिभीषणाच्या श्वासरूपी (वचनरूपी) वाऱ्यामुळे भडकला होता, त्यापासून श्रीरामाने बिभीषणाला वाचविले आणि त्याला (लंकेचे) अखंड राज्य दिले. ॥ ४९ ॥ (क)

जो संपति सिव रावनहि दीन्हि दिएँ दस माथ।
सोइ संपदा बिभीषनहि सकुचि दीन्हि रघुनाथ॥ ४९॥ (ख)

शिवाने जी संपत्ती रावणाला दहा शिरे अर्पण केल्यामुळे दिली होती, ती संपत्ती (लंकेचे राज्य) श्रीरामाने बिभीषणाला मोठ्या संकोचाने देऊन टाकली. ॥ ४९ ॥ (ख)

अस प्रभु छाड़ि भजहिं जे आना। ते नर पसु बिनु पूँछ बिषाना॥
निज जन जानि ताहि अपनावा। प्रभु सुभाव कपि कुल मन भावा॥ १॥

अशा प्रभू श्रीरामाला सोडून जी माणसे इतरांना भजतात, ते शिंगे व शेपटीशिवाय असलेले पशू होत. श्रीरामाने बिभीषणाला आपला सेवक समजून आपले मानले. प्रभूचा हा स्वभाव सर्व वानर-कुलाला फार आवडला. ॥ १ ॥

पुनि सर्बग्य सर्ब उर बासी। सर्बरूप सब रहित उदासी॥
बोले बचन नीति प्रतिपालक। कारन मनुज दनुज कुल घालक॥ २॥

मग सर्व जाणणारा, सर्वांच्या हृदयात वास करणारा, सर्व रूपांत प्रकट असलेला तरीही सर्वरहित व उदासीन असलेला, भक्तांवर कृपा करण्यासाठी मनुष्यरूप धारण केलेल्या आणि राक्षस कुळाचा नाश करणारा, नीति-मर्यादेचे पालन करणाऱ्या श्रीराम असे म्हणाला. ॥२॥

सुनु कपीस लंकापति बीरा। केहि बिधि तरिअ जलधि गंभीरा॥
संकुल मकर उरग झष जाती। अति अगाध दुस्तर सब भाँती॥ ३॥

'हे वीर वानरराज सुग्रीवा व लंकापती बिभीषणा, हा खोल समुद्र कसा पार करता येईल बरे? अनेक जातीच्या मगरी, साप व मासे यांनी भरलेला हा समुद्र ओलांडण्यास सर्व प्रकारे कठीण आहे.' ॥ ३ ॥

कह लंकेस सुनहु रघुनायक। कोटि सिंधु सोषक तव सायक॥
जद्यपि तदपि नीति असि गाई। बिनय करिअ सागर सन जाई॥ ४॥

(तेव्हा) लंकापती बिभीषण म्हणाला, 'हे रघुनायका, ऐक. तुझा एकच बाण कोट्यवधी समुद्रांना शोषून घेणारा आहे, तथापि नीती असे म्हणते की हे योग्य होईल. प्रथमतः समुद्राला जाऊन विनंती करावी. ॥ ५० ॥

दो०– प्रभु तुम्हार कुलगुर जलधि कहिहि उपाय बिचारि।
बिनु प्रयास सागर तरिहि सकल भालु कपि धारि॥ ५०॥

हे प्रभू, समुद्र हा तुझ्या कुळातील वडिलधारा (पूर्वज) आहे, विचार करून

तो उपाय सांगेल. मग अस्वल व वानर यांची सेना विनासायास समुद्र उल्लंघून जाऊ शकेल.' ॥ ५० ॥

सखा कही तुम्ह नीकि उपाई। करिअ दैव जौं होइ सहाई ॥
मंत्र न यह लछिमन मन भावा। राम बचन सुनि अति दुख पावा ॥ १ ॥

श्रीराम म्हणाला, 'मित्रा, तू चांगला उपाय सांगितलास. जर दैव सहाय्य करणारे असेल, तर हेच करावे.' परंतु हा सल्ला लक्ष्मणाला आवडला नाही. श्रीरामाचे म्हणणे ऐकून त्याला फार वाईट वाटले. ॥ १ ॥

नाथ दैव कर कवन भरोसा। सोषिअ सिंधु करिअ मन रोसा ॥
कादर मन कहुँ एक अधारा। दैव दैव आलसी पुकारा ॥ २ ॥

(लक्ष्मण म्हणाला) 'हे नाथ, दैवाचा भरवसा कसा करायचा ! मनात क्रोध आण आणि समुद्र शोषून टाक. दैव हे घाबरट मनाचा आधार आहे. (समाधान देण्याचा उपाय) म्हणून आळशी लोक दैव-दैव म्हणत असतात. ॥२॥

सुनत बिहसि बोले रघुबीरा। ऐसेहिं करब धरहु मन धीरा ॥
अस कहि प्रभु अनुजहि समुझाई। सिंधु समीप गए रघुराई ॥ ३ ॥

हे ऐकून श्रीराम हसत म्हणाला, 'असेच करू. तू मनात धीर धर.' असे म्हणून लहान भावाला समजावत श्रीराम हा समुद्राजवळ गेला. ॥ ३ ॥

प्रथम प्रनाम कीन्ह सिरु नाई। बैठे पुनि तट दर्भ डसाई ॥
जबहिं बिभीषन प्रभु पहिं आए। पाछें रावन दूत पठाए ॥ ४ ॥

प्रथमत: त्याने मस्तक नमवून समुद्राला प्रणाम केला. मग किनाऱ्यावर दर्भ पसरून बसला. इकडे जेव्हा बिभीषण श्रीरामाकडे आला, तेव्हा त्याच्या मागून रावणाने आपले दूत पाठविले होते. ॥ ४ ॥

दो०– सकल चरित तिन्ह देखे धरें कपट कपि देह।
प्रभु गुन हृदयँ सराहहिं सरनागत पर नेह ॥ ५१ ॥

त्यांनी वानरांचा कपट वेश धारण करून सर्व लीला पाहिली, ते आपल्या मनात प्रभूच्या गुणांची आणि शरणागतावरील त्याच्या प्रेमाची प्रशंसा करू लागले. ॥ ५१ ॥

प्रगट बखानहिं राम सुभाऊ। अति सप्रेम गा बिसरि दुराऊ ॥
रिपु के दूत कपिन्ह तब जाने। सकल बाँधि कपीस पहिं आने ॥ १ ॥

ते प्रकटपणे मोठ्या प्रेमाने श्रीरामाच्या स्वभावाची थोरवी गाऊ लागले. ते

लपून राहणे (कपटवेश) विसरून गेले. वानरांनी जाणले की हे शत्रूचे दूत आहेत. त्यांना बांधून ते सुग्रीवाजवळ आणले. ॥ १ ॥

कह सुग्रीव सुनहु सब बानर। अंग भंग करि पठवहु निसिचर॥
सुनि सुग्रीव बचन कपि धाए। बाँधि कटक चहु पास फिराए॥ २॥

सुग्रीव (त्यांना) म्हणाला, 'सर्व वानरांनो, या राक्षसांचे अवयव तोडून त्यांना परत पाठवा.' सुग्रीवाचे शब्द ऐकताच वानर धावले. त्या वानरांना बांधून त्यांनी सैन्यात चोहोकडे फिरविले. ॥ २ ॥

बहु प्रकार मारन कपि लागे। दीन पुकारत तदपि न त्यागे॥
जो हमार हर नासा काना। तेहि कोसलाधीस कै आना॥ ३॥

वानर त्यांना तऱ्हेतऱ्हेने मारू लागले. ते दीनवाणे होऊन ओरडत होते, तरीही वानरांनी त्यांना सोडले नाही. (मग ते ओरडून म्हणाले) 'जो आमचे नाक-कान कापेल, त्याला कोसलाधीश श्रीरामाची शपथ आहे.' ॥ ३ ॥

सुनि लछिमन सब निकट बोलाए। दया लागि हँसि तुरत छोड़ाए॥
रावन कर दीजहु यह पाती। लछिमन बचन बाचु कुलघाती॥ ४॥

हे ऐकून लक्ष्मणाने सर्वांना जवळ बोलावले. त्याला त्यांची दया आली. त्यामुळे त्याने हसत-हसत सर्वांना सोडविले. तो त्यांना म्हणाला की, 'रावणाला ही चिठ्ठी द्या आणि त्याला सांगा की, हे कुलघातक रावणा, लक्ष्मणाचे शब्द (निरोप) वाच. ॥ ४ ॥

दो०– कहेहु मुखागर मूढ़ सन मम संदेसु उदार।
सीता देइ मिलहु न त आवा कालु तुम्हार॥ ५२॥

आणि त्याला माझा हा उदार (कृपापूर्ण) निरोप तोंडी सांगा की सीता देऊन तू (श्रीरामाला) भेट. नाहीतर तुझा काळ आला असे समज.' ॥ ५२ ॥

तुरत नाइ लछिमन पद माथा। चले दूत बरनत गुन गाथा॥
कहत राम जसु लंकाँ आए। रावन चरन सीस तिन्ह नाए॥ १॥

लक्ष्मणाच्या पायांवर त्वरित मस्तक ठेवून ते दूत श्रीरामाचे गुणगान करीत निघाले. श्रीरामाची कीर्ती गात ते लंकेत आले आणि त्यांनी रावणाच्या पायांवर डोके ठेवले. ॥ १ ॥

बिहसि दसानन पूँछी बाता। कहसि न सुक आपनि कुसलाता॥
पुनि कहु खबरि बिभीषन केरी। जाहि मृत्यु आई अति नेरी॥ २॥

दशानन रावणाने हसून विचारले, 'अरे शुका, स्वतःची खुशाली का सांगत नाहीस? नंतर ज्याचा मृत्यू जवळ आला आहे, अशा त्या बिभीषणाची वार्ता सांग. ॥ २ ॥

करत राज लंका सठ त्यागी। होइहि जव कर कीट अभागी॥
पुनि कहु भालु कीस कटकाई। कठिन काल प्रेरित चलि आई॥ ३॥

(त्या) मूर्खाने राज्य करीत असतानासुद्धा लंकेचा त्याग केला. आता तो दुर्दैवी धान्यातील किडा होईल. (धान्याबरोबर किडेसुद्धा भरडले जातात, त्या प्रमाणे सर-वानरांबरोबर तोही मारला जाईल.) नंतर मग कठीण कालाच्या प्रेरणेने येथे आलेल्या अस्वल व वानर यांच्या सेनेची वार्ता सांग. ॥ ३॥

जिन्ह के जीवन कर रखवारा। भयउ मृदुल चित सिंधु बिचारा॥
कहु तपसिन्ह कै बात बहोरी। जिन्ह के हृदयँ त्रास अति मोरी॥ ४॥

कोमल मनाचा बिचारा समुद्र त्यांच्या (सैन्याच्या) जीवनाचा रक्षक झाला आहे. (जर त्यांच्या आणि राक्षसांच्या मध्ये समुद्र नसता तर राक्षसांनी आतापर्यंत त्यांना खाऊन टाकले असते.) त्यानंतर ज्यांच्या मनात माझ्याविषयी फार भीती आहे, त्या तपस्वी लोकांचा समाचार सांग. ॥ ४॥

दो०– की भइ भेंट कि फिरि गए श्रवन सुजसु सुनि मोर।
कहसि न रिपु दल तेज बल बहुत चकित चित तोर॥ ५३॥

त्यांची व तुझी भेट झाली का नाही? की कानांनी माझी कीर्ती ऐकून ते (सर्व) परत गेले? शत्रु-सैनेचे तेज व बळ सांगत का नाहीस? तुझे चित्त फारच चकित झालेले दिसते.' ॥ ५३॥

नाथ कृपा करि पूँछेहु जैसें। मानहु कहा क्रोध तजि तैसें॥
मिला जाइ जब अनुज तुम्हारा। जातहिं राम तिलक तेहि सारा॥ १॥

(दूताने सांगितले) 'हे स्वामी, तुम्ही कृपा करून जसे विचारले आहे, तसेच क्रोध सोडून माझे सांगणे ऐका. (माझ्या सांगण्यावर विश्वास ठेवा.) जेव्हा तुमचा लहान भाऊ श्रीरामाला जाऊन भेटला, तेव्हा तो पोहोचताच श्रीरामाने त्याला राजतिलक केला. ॥१॥

रावन दूत हमहि सुनि काना। कपिन्ह बाँधि दीन्हे दुख नाना॥
श्रवन नासिका काटैं लागे। राम सपथ दीन्हें हम त्यागे॥ २॥

आम्ही रावणाचे दूत आहोत हे जेव्हा वानरांनी कानांनी ऐकले तेव्हा त्यांनी आम्हाला बांधून पुष्कळ त्रास दिला. इतकेच काय, ते आमचे नाक-कान कापू लागले. श्रीरामाची शपथ घातल्यावर त्यांनी आम्हाला सोडले. ॥ २॥

पूँछिहु नाथ राम कटकाई। बदन कोटि सत बरनि न जाई॥
नाना बरन भालु कपि धारी। बिकटानन बिसाल भयकारी॥ ३॥

हे स्वामी, तुम्ही रामाच्या सेनेबद्दल विचारले, तेव्हा त्या सेनेचे वर्णन शंभर कोटी मुखांनीही करता येणार नाही. अनेक रंगांच्या अस्वलांची, वानरांची ती सेना आहे. ते भयंकर तोंडाचे, विशाल शरीराचे व भयानक असे आहेत. ॥ ३॥

जेहिं पुर दहेउ हतेउ सुत तोरा। सकल कपिन्ह महँ तेहि बलु थोरा॥
अमित नाम भट कठिन करालां। अमित नाग बल बिपुल बिसाला॥ ४॥

ज्याने लंकानगरी जाळली व तुमच्या पुत्राला (अक्षयकुमाराला) मारले, त्याचे (हनुमानाचे) बळ त्या मानाने सर्व वानरांमध्ये थोडे आहे. (त्या वानरांत) असंख्य नावांचे फारच कठोर व भयंकर योद्धे आहेत. त्यांच्या अंगी असंख्य हत्तींचे बळ आहे व ते फारच विशाल आहेत. ॥ ४॥

दो०– द्विबिद मयंद नील नल अंगद गद बिकटासि।
दधिमुख केहरि निसठ सठ जामवंत बलरासि॥ ५४॥

द्विविद, मयंद, नल, नील, अंगद, गद, विकटास्य, दधिमुख, केसरी, निशठ, शठ आणि जाम्बुवंत – हे सर्वजण (जण) बळाच्या राशी आहेत. ॥ ५४॥

ए कपि सब सुग्रीव समाना। इन्ह सम कोटिन्ह गनइ को नाना॥
राम कृपाँ अतुलित बल तिन्हहीं। तृन समान त्रैलोकहि गनहीं॥ १॥

हे सर्व वानर सुग्रीवाप्रमाणे (सामर्थ्यशाली) आहेत. यांच्यासारखे (एक-दोन नव्हे) कोट्यवधी आहेत. त्या सर्वांची मोजदाद कोण करणार? रामाच्या कृपेमुळे त्यांच्याठिकाणी अतुलनीय बळ आहे. ते तिन्ही लोकांना कस्पटासमान (तुच्छ) मानतात. ॥ १॥

अस मैं सुना श्रवन दसकंधर। पदुम अठारह जूथप बंदर॥
नाथ कटक महँ सो कपि नाहीं। जो न तुम्हहि जीतै रन माहीं॥ २॥

हे दशग्रीवा, मी असे ऐकले आहे की वानरांच्या सेनापतींचीच संख्या अठरा पद्म आहे. हे स्वामी, त्या सेनेमध्ये युद्धात तुम्हाला जिंकू शकणारा नाही, असा कोणीही वानर नाही. (सर्वजण तुम्हाला जिंकू शकतात.) ॥ २॥

परम क्रोध मीजहिं सब हाथा। आयसु पै न देहिं रघुनाथा॥
सोषहिं सिंधु सहित झष ब्याला। पूरहिं न त भरि कुधर बिसाला॥ ३॥

अत्यंत क्रोधाने ते सर्व हात चोळत बसले आहेत. परंतु श्रीराम त्यांना युद्धाची

आज्ञा देत नाही . (ते वानर म्हणतात) 'आम्ही मासे व सर्पांसह समुद्र शोषून टाकू. नाही तर मोठमोठ्या पर्वतांनी समुद्र भरून टाकू. ॥ ३ ॥

मर्दि गर्द मिलवहिं दससीसा । ऐसेइ बचन कहहिं सब कीसा ॥
गर्जहिं तर्जहिं सहज असंका । मानहुँ ग्रसन चहत हहिं लंका ॥ ४ ॥

आम्ही रावणाला धुळीत मिळवू,' सर्व वानर असेच बोलत आहेत. सर्वजण साहजिकच निःशंक आहेत. जणू ते लंकेला गिळून टाकू इच्छितात. ॥ ४ ॥

दो०– सहज सूर कपि भालु सब पुनि सिर पर प्रभु राम ।
रावन काल कोटि कहुँ जीति सकहिं संग्राम ॥ ५५ ॥

ते सर्व वानर स्वाभाविकपणे शूरवीर आहेत आणि त्यात त्यांच्या शिरावर श्रीराम प्रभू (सर्वेश्वर) आहे. हे रावणा, ते युद्धामध्ये कोट्यवधी कालांना जिंकू शकतात. ॥ ५५ ॥

राम तेज बल बुधि बिपुलाई । सेष सहस सत सकहिं न गाई ॥
सक सर एक सोषि सत सागर । तव भ्रातहि पूँछेउ नय नागर ॥ १ ॥

श्रीरामाच्या तेज (सामर्थ्य), बल आणि बुद्धी यांच्या विपुलतेचे वर्णन एक लाख (शत सहस्र) शेषनागही करू शकत नाहीत. तो एका बाणाने शेकडो सागर शोषून घेऊ शकतो, तरीही नीति-निपुण श्रीरामाने तुमच्या भावाला उपाय विचारला. ॥ १ ॥

तासु बचन सुनि सागर पाहीं । मागत पंथ कृपा मन माहीं ॥
सुनत बचन बिहसा दससीसा । जौं असि मति सहाय कृत कीसा ॥ २ ॥

त्याचे (बिभीषणाचे) म्हणणे ऐकून श्रीराम हा सागराजवळ मार्ग मागू लागला. त्याच्या मनात कृपा आहे.' (म्हणून तो समुद्राला शोषून घेत नाही.) दूताचे हे वचन ऐकून दशशीश रावण हसला व म्हणाला, 'अशी बुद्धी आहे, म्हणून तर त्याने वानरांना सहाय्यक बनविले आहे. ॥ २ ॥

सहज भीरु कर बचन दृढ़ाई । सागर सन ठानी मचलाई ॥
मूढ़ मृषा का करसि बड़ाई । रिपु बल बुद्धि थाह मैं पाई ॥ ३ ॥

स्वभावाने भित्रा असलेल्या बिभीषणाच्या शब्दांवर विश्वास ठेवून तो सागराजवळ आग्रह करीत बसला आहे. अरे मूर्खा, खोटे मोठेपण काय सांगतोस? मला शत्रूंच्या (रामाच्या) बळाची व बुद्धीची आता कल्पना आली आहे. ॥ ३ ॥

सचिव सभीत बिभीषन जाकें । बिजय बिभूति कहाँ जग ताकें ॥
सुनि खल बचन दूत रिस बाढ़ी । समय बिचारि पत्रिका काढ़ी ॥ ४ ॥

ज्याला बिभीषणासारखा भित्रा मंत्री मिळाला आहे, त्याला जगात विजय व

विभूती (ऐश्वर्य) कोठून मिळणार ?' दुष्ट रावणाचे हे वचन ऐकून दूताला फार राग आला. योग्य संधी पाहून त्याने पत्र काढले. ॥ ४ ॥

रामानुज दीन्ही यह पाती । नाथ बचाइ जुड़ावहु छाती ॥
बिहसि बाम कर लीन्ही रावन । सचिव बोलि सठ लाग बचावन ॥ ५ ॥

(तो म्हणाला,) 'रामाच्या लहान भावाने ही चिठ्ठी दिली आहे. हे नाथा, ही वाचून आनंदित व्हा.' रावणाने हसून ती डाव्या हाताने घेतली आणि मंत्र्याला बोलावून तो ती वाचून घेऊ लागला. ॥ ५ ॥

दो०– बातन्ह मनहि रिझाइ सठ जनि घालसि कुल खीस ।
राम बिरोध न उबरसि सरन बिष्नु अज ईस ॥ ५६ ॥(क)

(पत्रात लिहिले होते की) 'अरे मूर्खा, फक्त गप्पा मारूनच मनाची करमणूक करून घेऊन आपल्या कुळाचा नाश करू नकोस. रामाचा विरोध केल्यामुळे तू विष्णू, ब्रह्मदेव व महेश यांना शरण गेलास तरी वाचणार नाहीस.' ॥ ५६ ॥ (क)

की तजि मान अनुज इव प्रभु पद पंकज भृंग ।
होहि कि राम सरानल खल कुल सहित पतंग ॥ ५६ ॥(ख)

एक तर तू आपल्या छोट्या भावाप्रमाणे (बिभीषणाप्रमाणे) प्रभूच्या चरण-कमळांवरील भ्रमर बनून जा, किंवा अरे दुष्टा, श्रीरामाच्या बाणरूपी अग्नीमध्ये परिवारासह पतंग बनून (जळून) जा.' (दोन्हींपैकी जे आवडेल ते कर.) ५६ ॥ (ख)

सुनत सभय मन मुख मुसुकाई । कहत दसानन सबहि सुनाई ॥
भूमि परा कर गहत अकासा । लघु तापस कर बाग बिलासा ॥ १ ॥

पत्र वाचताच रावण मनात भयभीत झाला, परंतु तोंडाने (वरवर) हसत तो सर्वांना सांगत म्हणू लागला, 'ज्या प्रमाणे पृथ्वीवर पडलेला मनुष्य हाताने आकाश पकडण्याचा प्रयत्न करतो, त्या प्रमाणे हा छोटा तपस्वी (लक्ष्मण) वाग्विलास करतोय.' (फुशारक्या मारतोय.) ॥ १ ॥

कह सुक नाथ सत्य सब बानी । समुझहु छाड़ि प्रकृति अभिमानी ॥
सुनहु बचन मम परिहरि क्रोधा । नाथ राम सन तजहु बिरोधा ॥ २ ॥

(दूत) शुक म्हणाला, 'हे नाथा, अभिमानी स्वभाव सोडून देऊन (त्या पत्रात लिहिलेल्या) सर्व गोष्टी सत्य समजा. राग सोडून माझे वचन ऐका. हे नाथा, रामाशी वैर करणे सोडून द्या. ॥ २ ॥

अति कोमल रघुबीर सुभाऊ। जद्यपि अखिल लोक कर राऊ॥
मिलत कृपा तुम्ह पर प्रभु करिही। उर अपराध न एकउ धरिही॥ ३॥

श्रीराम हा जरी सर्व लोकांचा स्वामी आहे, तरी त्याचा स्वभाव अत्यंत कोमल आहे. भेटताच प्रभू तुमच्यावर कृपा करील आणि तो तुमचा एकही अपराध मनात ठेवणार नाही. ॥ ३॥

जनकसुता रघुनाथहि दीजे। एतना कहा मोर प्रभु कीजे॥
जब तेहिं कहा देन बैदेही। चरन प्रहार कीन्ह सठ तेही॥ ४॥

श्रीरघुनाथाला जनकसुता सीता देऊन टाका. हे प्रभू, एवढे माझे म्हणणे ऐका.' जेव्हा दूताने सीता देऊन टाकण्यास सांगितले, तेव्हा दुष्ट रावणाने त्याला लाथ मारली. ॥ ४॥

नाइ चरन सिरु चला सो तहाँ। कृपासिंधु रघुनायक जहाँ॥
करि प्रनामु निज कथा सुनाई। राम कृपाँ आपनि गति पाई॥ ५॥

तोसुद्धा (बिभीषणाप्रमाणे) रावणाच्या चरणी मस्तक नम्र करून जिथे श्रीराम होता तेथे गेला. (श्रीरामाला) प्रणाम करून त्याने आपली कथा सांगितली. रामाच्या कृपेने त्याला आपली गती (मुनीचे स्वरूप) प्राप्त झाली. ॥ ५॥

रिषि अगस्ति कीं साप भवानी। राछस भयउ रहा मुनि ग्यानी॥
बंदि राम पद बारहिं बारा। मुनि निज आश्रम कहुँ पगु धारा॥ ६॥

(शिव म्हणतो) 'हे भवानी, तो ज्ञानी मुनी होता, परंतु अगस्त्य ऋषीच्या शापामुळे तो राक्षस झाला होता. श्रीरामाच्या चरणी वारंवार वंदन करून तो आपल्या आश्रमाकडे निघून गेला. ॥ ६॥

दो०– बिनय न मानत जलधि जड़ गए तीनि दिन बीति।
बोले राम सकोप तब भय बिनु होइ न प्रीति॥ ५७॥

तीन दिवस निघून गेले, परंतु जड समुद्राने विनंती मानली नाही, तेव्हा श्रीराम रागाने म्हणाला की, 'भीतीविना प्रीती होत नाही. ॥ ५७॥

लछिमन बान सरासन आनू। सोषौं बारिधि बिसिख कृसानू॥
सठ सन बिनय कुटिल सन प्रीती। सहज कृपन सन सुंदर नीती॥ १॥

हे लक्ष्मणा, धनुष्य-बाण आण. मी अग्निबाणाने समुद्र शोषून टाकतो. मूर्खाची विनवणी, कुटिलाशी प्रेम, स्वभावाने कंजूस असणाऱ्याबरोबर चांगले धोरण (उदारता). ॥ १॥

ममता रत सन ग्यान कहानी। अति लोभी सन बिरति बखानी॥
क्रोधिहि सम कामिहि हरिकथा। ऊसर बीज बएँ फल जथा॥ २॥

ममतेमध्ये लिप्त असलेल्या मनुष्याला ज्ञानाची गोष्ट सांगणे, अत्यंत लोभी असलेल्यासमोर विरक्तीचे वर्णन करणे, क्रोधी माणसाला शमाची (शांततेची) गोष्ट शिकविणे आणि कामी माणसाला हरिकथा सांगणे, या गोष्टींचे फळ उजाड रानात बीज रोवण्यासारखे असते? (उजाड शेतात बीज रोवण्यासारखे व्यर्थ ठरते.) ॥ २॥

अस कहि रघुपति चाप चढ़ावा। यह मत लछिमन के मन भावा॥
संधानेउ प्रभु बिसिख कराला। उठी उदधि उर अंतर ज्वाला॥ ३॥

असे म्हणून श्रीरामाने धनुष्य लावले. (श्रीरामाचा) हा विचार लक्ष्मणाला आवडला. प्रभू रामाने भयंकर (अग्नी) बाणाचा नेम लावला. त्यामुळे समुद्राच्या हृदयात अग्नीची ज्वाळा उसळली. ॥ ३॥

मकर उरग झष गन अकुलाने। जरत जंतु जलनिधि जब जाने॥
कनक थार भरि मनि गन नाना। बिप्र रूप आयउ तजि माना॥ ४॥

मगर, साप व माश्यांचे समूह व्याकूळ झाले. जेव्हा समुद्राने सर्व जीव-जंतू जळत आहेत. असे पाहिले, तेव्हा तो सुवर्णाच्या तबकात अनेक मणी (रत्ने) भरून घेऊन व अभिमान सोडून ब्राह्मणाच्या रूपात प्रकट झाला. ॥ ४॥

दो०– काटेहिं पइ कदरी फरइ कोटि जतन कोउ सींच।
बिनय न मान खगेस सुनु डाटेहिं पइ नव नीच॥ ५८॥

(काकभुशुंडी म्हणतो,) 'हे गरुडा, ऐक. कोणी कितीही सिंचन करो, परंतु केळी ही कापल्यावरच फळाला येते. त्या प्रमाणे नीच मनुष्याला विनंती केली, तर तो मान्य करीत नाही, त्याला रागावल्यावरच तो वाकतो.' (सरळ मार्गावर येतो.) ॥५८॥

सभय सिंधु गहि पद प्रभु केरे। छमहु नाथ सब अवगुन मेरे॥
गगन समीर अनल जल धरनी। इन्ह कइ नाथ सहज जड़ करनी॥ १॥

भयभीत होऊन समुद्र प्रभू रामाचे पाय धरून म्हणाला, 'हे नाथा, माझ्या सर्व अवगुणांची (दोषांची) क्षमा कर. हे नाथा, आकाश, वायू, अग्नी, जल व पृथ्वी – या सर्वांची करणी जडच असते. ॥ १॥

तव प्रेरित मायाँ उपजाए। सृष्टि हेतु सब ग्रंथनि गाए॥
प्रभु आयसु जेहि कहँ जस अहई। सो तेहि भाँति रहें सुख लहई॥ २॥

तुझ्या प्रेरणेमुळे सृष्टीसाठी मायेने यांना निर्माण केले आहे, असे सर्व ग्रंथांनी

सांगितले आहे, ज्याला स्वामीची जशी आज्ञा आहे, त्याला त्या प्रमाणे राहण्यात सुख मिळते. ॥ २॥

प्रभु भल कीन्ह मोहि सिख दीन्ही। मरजादा पुनि तुम्हरी कीन्ही॥
ढोल गवाँर सूद्र पसु नारी। सकल ताड़ना के अधिकारी॥ ३॥

प्रभूने मला शिक्षा दिली, हे चांगले केले, परंतु मर्यादासुद्धा (जीवांचा स्वभाव) तूच बनविली आहेस. ढोल, मूर्ख, शूद्र, पशू व स्त्री हे सर्व शिक्षा करण्याच्या योग्यतेचे आहेत. ॥ ३॥

प्रभु प्रताप मैं जाब सुखाई। उतरिहि कटकु न मोरि बड़ाई॥
प्रभु अग्या अपेल श्रुति गाई। करौं सो बेगि जो तुम्हहि सोहाई॥ ४॥

प्रभूच्या प्रतापामुळे मी शुष्क झालो आणि सेना उतरून पलीकडे गेली, तर माझे त्यात मोठेपण (मर्यादा) नाही. तथापि प्रभूची आज्ञा उल्लंघनीय नाही, (तुझ्या आज्ञेचे उल्लंघन होऊ शकत नाही.) असे वेद म्हणतात. आता जशी तुझी इच्छा असेल, त्या प्रमाणे मी त्वरित करतो.' ॥ ४॥

दो०– सुनत बिनीत बचन अति कह कृपाल मुसुकाइ।
जेहि बिधि उतरै कपि कटकु तात सो कहहु उपाइ॥ ५९॥

(समुद्राचे) अत्यंत नम्र वचन ऐकून कृपाळू राम मंद स्मित करीत म्हणाला, 'हे तात, ज्यामुळे वानर-सेना पलीकडे उतरू शकेल, असा उपाय सांग.' ॥ ५९॥

नाथ नील नल कपि द्वौ भाई। लरिकाईं रिषि आसिष पाई॥
तिन्ह कें परस किएँ गिरि भारे। तरिहहिं जलधि प्रताप तुम्हारे॥ १॥

(समुद्र म्हणाला,) 'हे नाथा, नील व नल हे वानर बंधू आहेत. त्यांना लहानपणी ऋषींचा आशीर्वाद लाभला होता. त्यांनी स्पर्श केल्यावर तुझ्या प्रतापाने मोठमोठे पर्वतसुद्धा समुद्रावर तरंगू लागतील. ॥ १॥

मैं पुनि उर धरि प्रभु प्रभुताई। करिहउँ बल अनुमान सहाई॥
एहि बिधि नाथ पयोधि बँधाइअ। जेहिं यह सुजसु लोक तिहुँ गाइअ॥ २॥

मीसुद्धा प्रभूची प्रभुता मनात धरून आपल्या सामर्थ्यानुसार (माझ्याकडून शक्य ते) सहाय्य करीन. हे नाथा, अशा प्रकारे समुद्राला बांधून टाक. त्यामुळे तुझी सुंदर कीर्ती त्रैलोक्यात गायली जाईल. ॥ २॥

एहिं सर मम उत्तर तट बासी। हतहु नाथ खल नर अघ रासी॥
सुनि कृपाल सागर मन पीरा। तुरतहिं हरी राम रनधीरा॥ ३॥

या बाणाने माझ्या उत्तरेकडील तटावर राहणाऱ्या व पापांची रास असणाऱ्या दुष्ट लोकांचा वध कर.' कृपाळू श्रीरामाने समुद्राच्या मनातील दुःख ऐकून ते त्वरित हरण केले. (अर्थात बाणाने त्या दुष्टांचा वध केला.) ॥ ३॥

देखि राम बल पौरुष भारी। हरषि पयोनिधि भयउ सुखारी॥
सकल चरित कहि प्रभुहि सुनावा। चरन बंदि पाथोधि सिधावा॥ ४॥

श्रीरामाचे (ते) मोठे बळ व पौरुष पाहून समुद्र हर्षित होऊन सुखी झाला. त्याने त्या दुष्टांचे सर्व चरित्र प्रभूला सांगितले. मग त्याच्या चरणांची वंदना करून तो निघून गेला. ॥ ४॥

छं०– निज भवन गवनेउ सिंधु श्रीरघुपतिहि यह मत भायऊ।
यह चरित कलि मलहर जथामति दास तुलसी गायऊ॥
सुख भवन संसय समन दवन बिषाद रघुपति गुन गना।
तजि सकल आस भरोस गावहि सुनहि संतत सठ मना॥

समुद्र आपल्या घरी निघून गेला. श्रीरामाला त्याचे मत (सल्ला) आवडले. हे चरित्र कलियुगातील पापांचा नाश करणारे आहे. तुलसीदासाने आपल्या बुद्धीला अनुसरून हे गायले आहे. श्रीरामाच्या गुणांचे समूह हे सुख-धाम आहेत. ते संशयाचा नाश करणारे आणि विषादाचे दमन करणारे आहेत. हे मूर्ख मना, तू संसाराची आशा व भरवसा सोडून नित्य यांचे (श्रीरामाच्या गुणांचे) गायन कर व श्रवण कर.

दो०– सकल सुमंगल दायक रघुनायक गुन गान।
सादर सुनहिं ते तरहिं भव सिंधु बिना जलजान॥ ६०॥

श्रीरामाचे गुण-गान हे संपूर्ण व सुंदर कल्याण प्रदान करणारे आहे. जो आदरपूर्वक हे ऐकेल, तो कोणत्याही जहाजाविना (इतर साधनाविना) भवसागर पार करून जाईल. ॥ ६०॥

इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने
पंचमः सोपानः समाप्तः।

कलियुगातील सर्व पापांचा नाश करणाऱ्या श्रीरामचरितमानसातील हा
पाचवा सोपान समाप्त झाला.

(सुन्दरकाण्ड समाप्त)

* * *